नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २६ * | * अमरावती * | शनिवार, दिनांक २६ जुलै २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## उल्लूसह २५ ओटीटी प्लॅटफॉर्मवर बंदी

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २५ :**
केंद्र सरकारने शुक्रवारी अश्लील सामग्री प्रसारित करणाऱ्या २५ ओटीटी प्लॅटफॉर्मवर बंदी घातली. हे ॲप्स मनोरंजनाच्या नावाखाली अश्लील आणि आक्षेपार्ह व्हिडिओ सादर करत असल्याचे सरकारचे म्हणणे आहे.

सरकारने एक अधिसूचना जारी करून इंटरनेट सेवा प्रदात्यांना हे डळळ ॲप्स आणि वेबसाइट्स ब्लॉक करण्यास सांगितले आहे. बंदी घातलेल्या ॲप्समध्ये एएलटीटी, उल्लू, देसी फ्लिक्स सारखे प्रसिद्ध प्लॅटफॉर्म देखील समाविष्ट आहेत. एएलटीटी ॲप एप्रिल २०१७ मध्ये चित्रपट आणि टीव्ही निर्माती एकता कपूर यांनी लाँच केले होते. उल्लू ॲप २०१८ मध्ये आयआयटी कानपूरचे पदवीधर विभू अग्रवाल यांनी तयार केले होते.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

### समोसा, कचोरी, जिलेबी द्रोह्यांना...

आपल्या देशाचे आरोग्य मंत्रालय म्हणजेच स्वास्थ्य मंत्रालय काही दिवसांपूर्वी ताल ठोकून म्हणते झाले होते की, समोसा कचोरी आणि जिलेबी सारखे पदार्थ आरोग्याला अत्यंत हानिकारक आहेत. स्वास्थ्य मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी दिल्लीत बसून हा निष्कर्ष काढला. या सर्वांना म्हणजेच स्वास्थ्य मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांना या सर्व भारतीय पदार्थांच्या चवीचा आणि प्रभावाचा पत्ताच नाही. समोसा, बटाटेवडे, कचोरी यामध्ये तेल जास्त असते. जिलेबीमध्ये तर साखरही जास्त असते. पण हे पदार्थ भारतीय जनमानसात इतके रुळलेले आणि रुजलेले आहेत की स्वास्थ्य मंत्रालयाच्या अतिविद्वान अधिकाऱ्यांनी कितीही आरडाओरड आणि गहजब केला. तरी हे पदार्थ विकणाऱ्या दुकानांवर खवय्यांची गर्दी ओसंडून वाहत आहे. आपल्या स्वास्थ्य मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांना हे खुट्टीउपाड धंदे करण्याची गरज काय आहे, हेच आम्हाला कळत नाही. जणू काही समोसे, कचोरी, भजी किंवा भजे म्हणजेच कांदाभजी, बटाटा भजी आणि इतर भाज्यांसोबत बनवलेली भजी त्यासोबत जिलेबी, बटाटेवडे म्हणजे आलू भोंडे आणि कचोरी हे पदार्थ म्हणजे जणू काय या देशाच्या स्वास्थ्यासमोरील मोठेच मिशन आहे. अशा थाटात अस्वस्थ असलेल्या स्वास्थ्य मंत्रालयाने फतवा काढला. आपल्या देशात आता अनेक खाद्यपदार्थ दहा किंवा पंधरा रुपयांच्या पाकिटात विकले जातात, ते पदार्थ खराब होऊ नयेत म्हणून त्यात काय काय टाकले जाते. याची चौकशी केल्यावर समोसा आणि जिलेबी अत्यंत कमी हानिकारक आहे असाही निष्कर्ष सहज निघेल. या स्वास्थ मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी गुजरातच्या फाफडा, ढोकळा, खमणी, खांडवी, भावनगरी गाठीया फरसाण, बाकरवडी याबाबत बोलण्याची हिंमत करून दाखवावी. मग त्याच क्षणाला आपल्या स्वास्थ्य मंत्रालयाचा मोक्षमार्ग खुला होईल. खरे पाहता भारतीय खाद्य पदार्थांमध्ये जे जे मसाले असतात ते सर्व औषधी प्रमाणे गुणकारी असतात. त्यामध्ये जिरे काय, धने काय, लवंग काय, हिंग काय, मिरे काय, ओवा काय, जायफळ काय, दालचिनी काय, तमालपत्री काय किंवा अगदी सर्वगुणी हळद आणि सुंठीसारखे पदार्थ सुद्धा अत्यंत औषधी आहेत. अगदी औषधाप्रमाणे गुणकारी आहेत. हे सर्व पदार्थ आरोग्याला हानिकारक आहेत, असे जर कोणी म्हटले तर, तुका म्हणे अशा नरा मोजून माराव्या पैजारा असेच म्हणावेसे वाटेल. मुंबईमध्ये काळबादेवीच्या रस्त्यावर शुद्ध तुपातील जिलेबी खाल्ल्यावर ज्याचे उदर प्रसन्नतेने हसणार नसेल, तो सच्चा भारतीय होऊच शकत नाही. एक गोष्ट नक्की आहे. ती म्हणजे जी जिलेबी काय किंवा समोसा काय हे पदार्थ २०० ते ३०० वर्षांपूर्वी भारतामध्ये बाहेरून आलेले आहेत. अगदी बटाटेवडेही आपले नाहीत. पण या सर्व पदार्थांना भारताचे नागरिकत्व सर्व भारतीयांनी मनापासून बहाल केलेले आहे. त्यामुळे ज्या कोणी अतिविद्वान आणि स्वास्थ्याबद्दल अतिआग्रही असलेल्या मंडळींनी या खमंग आणि मधुर पदार्थांची बदनामी केली आहे, त्याबद्दल त्यांच्याविरुद्ध दहा हजार करोडचा अब्रुनुकसानीचा दावाच दाखल केला पाहिजे. अरे बाबांनो, भारतीयांच्या शरीरात हे सर्व पदार्थ खाऊन पचवण्याची मजबूत ताकद आहे. त्यामुळे अशा फालतू सल्ल्यांवर भारतातील जनतेने जराही विश्वास ठेवू नये अशी आमची संपूर्ण भारत वर्षातील खवय्यांना विनंती आहे. आपण जर हे पदार्थ खाल्ले नाही, तर देशातील कोट्यावधी हॉटेल चालक आणि या पदार्थांचे उत्पादक रस्त्यावर येतील. आधीच आपला देश बेरोजगारीच्या विळख्यात अडकलेला आहे, त्यात आणखी भर पडेल. त्यामुळे भारतातील सर्व खवय्यांनी या पदार्थांचा जयजयकार करून आपल्या रसनेला रसनापूर्ती करण्यास मोकळीक द्यावी. अशी आशा केली, तर कुणालाच वाईट वाटणार नाही ना.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

### शहा - फडणवीस भेटीत मंत्रिमंडळ फेरबदलावर चर्चा

# अनेकांना डच्चू मिळणार?

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २५ :**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा दिल्ली दौरा आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या भेटीमुळे महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात मोठ्या फेरबदलाची चर्चा पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे. दाव्यानुसार, जवळपास ८ मंत्र्यांना मंत्रिमंडळातून 'डच्चू' मिळू शकतो, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

चर्चेनुसार, ज्या मंत्र्यांची मंत्रिपदे धोक्यात येण्याची शक्यता आहे, त्यात शिंदे गटाचे संजय शिरसाट, संजय राठोड, भरत गोगावले आणि योगेश कदम यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाचे माणिकराव कोकाटे यांचेही मंत्रिपद जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**महाजनांना डच्चू मिळण्याची चर्चा**

या सर्व चर्चांदरम्यान, भाजपचे संकटमोचक आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे जवळचे सहकारी गिरीश महाजन यांना मंत्रिमंडळातून बाजूला करत त्यांना पक्षाची संघटनात्मक जबाबदारी दिली जाऊ शकते, अशीही चर्चा सुरू झाली आहे.

दुसरीकडे, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी या चर्चांवर सावध प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, मंत्रिमंडळाबाबतचा कुठलाही निर्णय राज्यस्तरावर होत नाही, तो केंद्रीय स्तरावर होत असतो. काही बदल होणार असेल, तर तो योग्य वेळी कळतो, पण सध्या असा काही बदल होईल, असे मला वैयक्तिकरित्या वाटत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, महायुतीमधील काही मंत्र्यांमुळे सकारची बदनामी होत असल्याची चर्चा असून, त्यांना नारळ देण्याबाबत फडणवीस आणि केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्यात खलबते झाल्याचे सांगण्यात येत आहे. येत्या काही दिवसात काही मंत्र्यांची गच्छंती निश्चित मानली जात असून, काही नवे चेहरे येवू शकतात.



**पक्षाची इच्छा तीच माझी इच्छा- नार्वेकर**

दरम्यान, दैनिक 'सामना'ने दिलेल्या बातमीनुसार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे मंत्री होण्याची शक्यता असून, सध्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना विधानसभा अध्यक्षपद देण्यात येणार असल्याची चर्चा आहे. यावर राहुल नार्वेकर यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, माध्यमांमधील बातम्यांवर आपला विश्वास नसून, पक्षाच्या नेतृत्वावर माझा पूर्ण विश्वास आहे. पक्ष जी जबाबदारी देईल ती स्वीकारण्यास आपण तयार आहोत, जी पक्षाची इच्छा असेल, तीच माझी इच्छा असेल, असे त्यांनी नमूद केले. तुमच्या आशीर्वादाने नवीन काही जबाबदारी मिळत असेल, तर आनंदच होईल, असे मिश्कीलपणे ते म्हणाले.

### शाळेची इमारत कोसळून

# ५ मुलांचा मृत्यू



३० हून अधिक गंभीर जखमी

ढिगाऱ्याखाली दबलेल्या मुलांना गावकऱ्यांनी बाहेर काढले

■ **वृत्तसंस्था, अकलेरा (झालावाड), दि. २५ :**
राजस्थानच्या झालावाडमध्ये सरकारी शाळेची इमारत कोसळून ५ मुलांचा मृत्यू झाला. या अपघातात ३० हून अधिक मुले गंभीर जखमी झाली आहेत. शुक्रवारी सकाळी मनोहरथाना ब्लॉकमधील पीपलोदी सरकारी शाळेत हा अपघात घडला.


शिक्षक आणि ग्रामस्थांच्या मदतीने मुलांना बाहेर काढून मनोहरथाना रुग्णालयात नेण्यात आले. यापैकी ११ गंभीर जखमींना जिल्हा रुग्णालयात रेफर करण्यात आले आहे. दरम्यान, राजस्थानचे शिक्षण मंत्री मदन दिलावर यांनी सांगितले आहे की, सर्व जखमींवर सरकारी खर्चाने उपचार केले जातील. अपघाताची चौकशी करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना घटनास्थळी पाठवण्यात आले आहे. अपघातानंतर शाळेत सर्वत्र मुलांची पुस्तके आणि सामान विखुरलेले दिसून आले.

गावकऱ्यांनी सांगितले की ढिगाऱ्यात दबलेली सर्व मुले ७वीच्या वर्गात शिकत होती. अपघाताच्या वेळी मुले शिकत होती. सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. इमारत कोसळली तेव्हा स्फोटासारखा आवाज आल्याचे स्थानिक लोकांनी सांगितले. सुमारे एक तासाच्या बचाव कार्यानंतर सर्व जखमी मुलांना बाहेर काढण्यात आले.

## मोदींनी मोडला इंदिरा गांधींचा विक्रम

■ **वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. २५ :**
नरेंद्र मोदी हे भारताचे दुसरे सर्वात जास्त काळ पंतप्रधान राहिलेले पंतप्रधान बनले आहेत. त्यांनी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा ४०७७ दिवसांचा (२४ जानेवारी १९६६ ते २४ मार्च १९७७) विक्रम मोडला आहे. पंतप्रधान मोदींनी शुक्रवारी पंतप्रधान म्हणून ४०७८ दिवस पूर्ण केले.

**सलग सर्वाधिक काळ पीएम राहणारे दुसरे**



सर्वाधिक काळ सलग पंतप्रधान राहण्याचा विक्रम जवाहरलाल नेहरू यांच्या नावावर आहे. त्यांनी १५ ऑगस्ट १९४७ ते २७ मे १९६४ पर्यंत म्हणजेच एकूण ६१२६ दिवस सलग हे पद भूषवले. पंतप्रधान मोदी नेहरूंच्या विक्रमापेक्षा २०४८ दिवस मागे आहेत.

तथापि, सलग तीन लोकसभा निवडणुका (२०१४, २०१९, २०२४) जिंकण्याच्या बाबतीत पंतप्रधान मोदींनी नेहरूंची बरोबरी आधीच केली आहे. २०२९ च्या लोकसभा निवडणुका जिंकल्यानंतर जर ते पंतप्रधान झाले तर सतत पंतप्रधान होण्याचा विक्रमही मोडला जाऊ शकतो.

मोदी २००१ ते २०१४ पर्यंत गुजरातचे मुख्यमंत्री होते. त्यानंतर २६ मे २०१४ पासून ते पंतप्रधान झाले. अशाप्रकारे, ते राज्य आणि केंद्रात (२४ वर्षांहून अधिक काळ) निवडून आलेल्या सरकारच्या प्रमुखपदाची जबाबदारी सांभाळणारे पहिले भारतीय नेते बनले आहेत. स्वातंत्र्यानंतर जन्मलेले मोदी हे पहिले पंतप्रधान आहेत. ते दोन टर्म पूर्ण करणारे पहिले बिगर-काँग्रेसी पंतप्रधान आणि सर्वात जास्त काळ पंतप्रधान राहिलेले पंतप्रधान आहेत.

**सलग ६ निवडणुकांमध्ये पक्षाला विजय मिळवून दिला**

वृत्तसंस्थेने एका सरकारी अधिकाऱ्याच्या हवाल्याने म्हटले आहे की, मोदी हे भारतातील एकमेव नेते आहेत ज्यांनी सलग सहा निवडणुकांमध्ये पक्षाला विजय मिळवून दिला आहे.

२००२, २००७ आणि २०१२ मध्ये गुजरात विधानसभा निवडणुका आणि २०१४, २०१९ आणि २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकांमध्ये त्यांनी भारतीय जनता पक्षाला विजय मिळवून दिल्याचा दावा संस्थेने केला आहे .

### निवृत्तीनंतर कोणतेही शासकीय लाभाचे

## पद स्वीकारणार नाही

■ **महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, दि. २५ :**
सर्वोच्च न्यायालयाचे विद्यमान सरन्यायाधीश आणि महाराष्ट्राचे सुपुत्र भूषण गवई यांनी निवृत्तीनंतर कोणतेही शासकीय लाभाचे पद स्वीकारणार नसल्याचे म्हटले आहे.

**सरन्यायाधीश भूषण गवई यांचे मोठे विधान**



मी निवृत्तीनंतर जास्तीत जास्त वेळ दारापूर, अमरावती आणि नागपुरात या आपल्या मूळ गावी घालवणार असल्याचे गवई म्हणाले. सरन्यायाधीश झाल्यानंतर प्रथमच भूषण गवई हे त्यांच्या मूळ गाव असलेल्या दारापुरात पोहोचले होते. यावेळी ते गावकऱ्यांशी बोलत होते.

सरन्यायाधीश भूषण गवई यांचे गावातील नागरिकांच्या वतीने जल्लोषात स्वागत करण्यात आले. सरन्यायाधीशांना पाहण्यासाठी गावकऱ्यांनी देखील मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. गावात पोहोचताच गवई यांनी आपल्या लहानपणीच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच जुन्या घराला देखील भेट दिली.

यावेळी सरन्यायाधीश यांनी विकंदर महाराज, राजे बुवा महाराज, हनुमान मंदिर आदी ठिकाणी भेट देऊन दर्शन घेतले. शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सरन्यायाधीशांचे अगदी उत्साहात स्वागत केले. तसेच भारत माता की जय, अशा घोषणा दिल्या. एकोप्याने राहणाऱ्या गावाचे प्रतीक म्हणजे दारापूर गाव असल्याचे सरन्यायाधीश गवई यावेळी म्हणाले.

### मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाबाहेर

## सिलिंगचा भाग कोसळला

मंत्रालयात दुर्घटना : सुदैवाने जीवितहानी नाही

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :**
मुंबईतील मंत्रालयात आज सकाळी एक अपघाताची घटना घडली. मंत्रालयाच्या सातव्या मजल्यावर असलेल्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाच्या बाहेरील सिलिंगचा काही भाग गंज लागल्यामुळे अचानक कोसळला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही आणि कुणीही जखमी झालेले नाही.

सामान्यतः या कक्षाबाहेर रुग्णांच्या नातेवाईकांची रांग लागलेली असते, अनेक नागरिक वैद्यकीय सहाय्य मिळवण्यासाठी येथे दररोज येत असतात. सिलिंगमधून कोसळलेला भाग गंजलेल्या लोखंडाचा असून, घटनास्थळी सफाई कर्मचाऱ्यांनी तत्काळ हस्तक्षेप करून ढिगारा हटवला.

या घटनेमुळे मंत्रालयाच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. सार्वजनिक ठिकाणी अशा प्रकारच्या अपघातांमुळे नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण होतोय, हे या घटनेतून पुन्हा अधोरेखित झाले आहे. प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेऊन तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी उपस्थित केली जात आहे.

### स्थानिक स्वराज्य संस्थांची आगामी निवडणूक

# राज्यात भाजपा स्वबळावर?

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २५ :**
राज्यातील सत्ताधारी भाजपने स्थानिक स्वराज्य संस्थांची आगामी निवडणूक स्वबळावर लढण्याची तयारी सुरू केल्याची विश्वसनीय माहिती समोर आली आहे.

**मुंबईसाठी घेणार शिंदे, दादांची मदत**

त्यानुसार भाजप मुंबई वगळता संपूर्ण महाराष्ट्रात स्वबळावर निवडणूक लढवेल. पण मुंबईत एकनाथ शिंदे यांची शिवसेना व अजित पवारांच्या राष्ट्रवादीची मदत घेईल. भाजपच्या या रणनीतीमुळे महायुतीच्या घटकपक्षांच्या पोटात भीतीचा गोळा उठला आहे.

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी गुरूवारी रात्री उशिरा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. या भेटीत त्यांच्यात महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर चर्चा झाल्याची माहिती आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, भाजप महाराष्ट्रात स्वबळावर निवडणूक लढवेल. काही दिवसांपूर्वी स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तसे संकेत दिले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुती कायम राहील. पण ज्या ठिकाणी युती होणार नाही, त्या ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होतील, असे ते म्हणाले होते. आता मुंबई वगळता उर्वरित सर्वच ठिकाणी भाजप स्वबळावर निवडणूक लढवेल असे समोर आले आहे.

सूत्रांच्या मते, महायुतीमधील भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना हे तिन्ही पक्ष मुंबई वगळता सर्वच ठिकाणी स्वबळावर लढताना म्हणजे एकमेकांविरोधात प्रचार करताना दिसून येतील. पण मुंबईत ते एकमेकांना पुरक अशी भूमिका घेऊन निवडणूक लढतील.

## दादा देणार कृषिमंत्र्यांना 'नारळ'

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि.२५ :**
अखिल भारतीय छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजय घाडगे यांना मारहाण करणाऱ्या सूरज चव्हाणसाठी सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसने आपली कवाडे बंद केली आहेत. अजित पवार यांनी स्वतः आपल्याला हा शब्द दिल्याचा दावा विजय घाडगे यांना केला आहे.

**कोकाटेंवर मंगळवारपर्यंत कारवाईची शक्यता**



सोबतच विधिमंडळात रमी खेळण्याचा आरोप झालेले कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावरही मंगळवारपर्यंत योग्य ती कारवाई करणार असल्याचे आश्वासन अजित पवारांनी दिल्याचे घाडगे म्हणाले.

घाडगे यांनी आज पुण्यात अजित पवार यांची भेट घेतली. या दोन्ही नेत्यांत जवळपास अर्धा तास चर्चा झाली. अजित पवारांनी सांगितले की सूरजचव्हाण यांचा राजीनामा देखील घेतला असून त्याला पुन्हा पक्षात घेतले जाणार नाही. तसेच मंगळवार पर्यंत कोकाटेंवर कारवाई करण्याचे आश्वासन दादांनी दिल्याचे घाडगे यांनी सांगितले.

## एसआयआरवर इंडिया ब्लॉकची निदर्शने

२८ पासून सभागृह चालवण्यावर एकमत

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २५ :**
संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पाचव्या दिवशी, बिहार मतदार पडताळणीच्या मुद्द्यावरून विरोधकांनी संसदेच्या आवारात निदर्शने केली. विरोधी पक्षाच्या खासदारांनी गांधी पुतळ्यापासून मकरद्वार पर्यंत मोर्चा काढला. राहुल गांधी, प्रियंका गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे यांनीही यात भाग घेतला.

मकरद्वार येथे पोहोचताच, राहुल-प्रियंका यांच्यासह विरोधी खासदारांनी स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन लिहिलेले पोस्टर्स फाडले. ते प्रतीकात्मक कचऱ्याच्या डब्यात फेकले. त्यांनी मोदी सरकार खाली पाडा अशा घोषणाही दिल्या.

लोकसभेतही विरोधकांनी घोषणाबाजी केली. सभागृहातील कामकाज फक्त २० मिनिटे चालले. सभापती ओम बिर्ला यांनी सर्वपक्षीय बैठक बोलावली. २८ जुलैपासून सभागृहाचे कामकाज सुरळीत चालविण्याबाबत एकमत झाले आहे. त्याच दिवशी ऑपरेशन सिंदूरवरही चर्चा होईल. मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, केंद्र गरिबांना त्यांच्या मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवू इच्छितात आणि फक्त उच्चभ्रू वर्गाला मतदान करू देऊ इच्छितात. केंद्र सरकार संविधानाचे पालन करत नाहीत. एसआयआरविरुद्धचा आमचा लढा सुरूच राहील.




**ऑपरेशन सिंदूरवर सरकारची पहिल्यांदाच संसदेत प्रतिक्रिया**

सरकारने पहिल्यांदाच संसदेत ऑपरेशन सिंदूर आणि युद्धबंदीवरील प्रश्नांना उत्तरे दिली. परराष्ट्र राज्यमंत्री कीर्तिवर्धन सिंह यांनी राज्यसभेत लेखी उत्तरात सांगितले की, पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी केलेल्या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून ऑपरेशन सिंदूर सुरू करण्यात आले. भारताने ७ मे रोजी पाकिस्तानचे ९ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. यानंतर पाकिस्तानने भारतीय लष्करी तळ आणि नागरिकांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला, परंतु याला जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले.

**'समाजवाद' आणि 'धर्मनिरपेक्षता' हे शब्द संविधानातून वगळले जाणार नाहीत**



केंद्र सरकारने राज्यसभेत सांगितले की, संविधानाच्या प्रस्तावनेतून 'समाजवाद' आणि 'धर्मनिरपेक्षता' हे शब्द काढून टाकण्याची सध्या कोणतीही योजना किंवा हेतू नाही. हे शब्द आणीबाणीच्या काळात जोडले गेले होते. कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी लेखी उत्तरात म्हटले आहे की, 'काही गट या शब्दांचा पुनर्विचार करण्यासाठी आपले मत व्यक्त करू शकतात. यामुळे सार्वजनिक चर्चा किंवा वातावरण तयार होते, परंतु ते सरकारच्या अधिकृत भूमिकेला प्रतिबिंबित करत नाही.

## महामंडळ वाटपाचा ४४-३३-२३ फॉर्म्युला समोर : पेच सुटला!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :**
राज्यात भाजपा, राष्ट्रवादी (अजित पवार गट), शिवसेना (शिंदे गट) हे तिन्ही पक्ष महायुतीच्या रुपात एकत्र आले असून सध्या सत्तेच्या सिंहासनावर आहेत. हे तिन्ही पक्ष एकत्र असले तरी त्यांच्यात अंतर्गत रस्सीखेच चालू असल्याचे बोलले जाते. महायुतीतील नाराजीही अनेकवेळा समोर आली आहे. दरम्यान, आता महायुतीचा एक नवा आणि महत्त्वाचा फॉर्म्यूला समोर आला आहे.

सरकार स्थापन झाल्यापासून अनेक नेत्यांमध्ये नाराजी आहे. तिन्ही पक्षांतील नेत्यांनी मंत्रिपदासाठी जोर लावला होता. पण प्रत्यक्ष संधी मात्र दुसऱ्याच नेत्याला दिली गेली. त्यामुळेच तिन्ही पक्षातील काही नेते नाराज आहेत. नाराजी दूर करण्यासाठी राज्यातील वेगवेगळी महामंडळे फार महत्त्वाची भूमिका निभावत असतात. याच महामंडळाच्या वाटपाबाबत नवा फॉर्म्यूला समोर आला आहे. महायुतीत महामंडळ वाटप ठरले असून या सूत्रानुसार महामंडळ वाटप केले जाणार असल्याचे बोलले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारमधला महामंडळ वाटपाचा पेच अखेर सुटला आहे. संख्याबळानुसार महायुतीत महामंडळांचे वाटप करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून पुढे आली आहे. यात महायुतीतील मोठा भाऊ असलेल्या भाजपाच्या वाट्याला ४४, शिंदेंच्या शिवसेनेला ३३, तर अजित दादांच्या राष्ट्रवादीला २३ महामंडळ या सूत्रावर एकमत झाल्याचेही समोर आले आहे.



लवकरच राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची घोषणा होणार आहे. त्यामुळे आज-माजी आमदार, विद्यमान तसेच माजी मंत्र्यांमधील नाराजी दूर करण्यासाठी लवकरच महामंडळाचे वाटप केले जाऊ शकते, असे सांगितले जात आहे.

या महामंडळ वाटपातून नाराज नेत्यांना संतुष्ट करण्याचा प्रयत्न करण्याची शक्यता आहे. राज्यात सिडको आणि म्हाडा यासारखी चर्चेत असलेली आणि महत्त्वाची समजली जातात. या महामंडळांसाठीही महायुतीच्या पक्षांत रस्सीखेच सुरू असल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळेच ही महामंडळे नेमके कोणाच्या पदरात पडणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मेंढपाळांनी शेकडो मेंढ्या रस्त्यावर आणून चांदूर रेल्वे - अमरावती मार्ग रोखला

## चिरोडी येथे 2 तास चक्काजाम आंदोलन | विविध पक्ष-संघटनांचा सहभाग

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.25 )** - शेतकरी, शेतमजूर, मेंढपाळ, दिव्यांग आणि इतर मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांनी गुरुवारी (24 जुलै) राज्यभरात चक्काजाम आंदोलन पुकारले. या पार्श्वभूमीवर चांदूर रेल्वे - अमरावती महामार्गावर चिरोडी गावाजवळ दोन तास चक्काजाम आंदोलन करण्यात आले.



या आंदोलनात मेंढपाळांनी शेकडो मेंढ्या रस्त्यावर आणून महामार्ग रोखला, त्यामुळे वाहनांची प्रचंड गर्दी झाली व वाहतूक विस्कळीत झाली. चक्काजाम सकाळी 8 ते 10 दरम्यान झाला. रस्त्यावर नागरिक, शेतकरी, शेतमजूर बसून होते आणि मेंढ्यांचा ताफाही मार्गात होता. आंदोलनादरम्यान मेंढपाळांच्या समस्यांबाबत तात्काळ निर्णय घ्या, अशी जोरदार मागणी करण्यात आली. चिरोडी येथील चक्काजाम आंदोलनात विविध राजकीय पक्ष व संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यामध्ये मेंढपाळ आर्मी पुत्रचे जिल्हाध्यक्ष अर्जुन महानर, भीमराव महानर, प्रहार जनशक्तीचे सौरभ इंगळे, ऋषीकेश फटे, सचिन इमले, अक्षय वासनकर, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रशांत शिरभाते व दिनेश आमले, शिवसेना (ठाकरे गट) चे संजय चौधरी व रोशन खंडार, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे अमोल दुधाट, कम्युनिस्ट पक्षाचे कॉ. विनोद जोशी, तसेच दादाराव माने, ज्योतीराम बिचुकले, सुनील महानर, बाळू कोकरे, तुकाराम यमगर, संजय कोकरे, अर्जुन माने, मंगेश घुले यांच्यासह अनेक कार्यकर्ते व मेंढपाळ बांधव उपस्थित होते. या आंदोलनामुळे वाहतूक बंद झाल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला, काही वाहने पर्यायी मार्गाने वळविण्यात आली. पोलीस बंदोबस्त तगडा ठेवण्यात आला होता. आंदोलन शांततेत पार पडल्यानंतर मार्ग मोकळा करण्यात आला. शेतकरी व मेंढपाळांच्या न्याय्य मागण्यांकडे शासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज आहे, असा सूर आंदोलनकर्त्यांकडून व्यक्त झाला.

# झटामझिरी गावात तालुक्यातील पहिलं मोफत विधी सहाय्य केंद्र सुरू

## न्यायालय पहिल्यांदाच गावाच्या दारी




**महासागर प्रतिनिधी**

**वरूड, ( दि.25 )** - वरूड तालुक्याच्या इतिहासात एक महत्त्वपूर्ण आणि लोककल्याणकारी पाऊल उचलण्यात आले आहे. झटामझिरी गावात तालुक्यातील पहिले मोफत विधी सहाय्य केंद्र सुरू करण्यात आले असून, यामुळे न्यायालयीन सेवा आता गावकऱ्यांच्या दारी पोहोचली आहे. भारतीय संविधानाच्या कलम 39(अ) अंतर्गत असलेल्या कायदेशीर मदतीच्या हक्काच्या आधारे हे केंद्र सुरू करण्यात आले आहे. याचा उद्देश दलित, आदिवासी, मागासवर्गीय, महिला आणि इतर वंचित घटकांना मोफत कायदेशीर सल्ला देणे हा आहे. ग्रामपंचायत कार्यालयाच्या सभागृहात पार पडलेल्या उद्घाटन कार्यक्रमात जिल्हा सत्र न्यायाधीश पंचभाई साहेब, मुख्य दिवाणी न्यायाधीश ईश्वर ठाकरे, सह न्यायाधीश राजूरकर, वरूड वकील संघाचे अध्यक्ष अ‍ॅड. कुरेशी, गटविकास अधिकारी पिल्लारे, प्रा. कमलनारायण उईके आणि सरपंच हिराकांत उईके उपस्थित होते. या केंद्राचे प्रथम न्यायदूत म्हणून झटामझिरी गावचेच अ‍ॅड. पवन वाडीवे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रत्येक सोमवार व मंगळवार सकाळी 10 ते 11 वाजेपर्यंत हे केंद्र सुरू राहणार असून, प्रख्यात वकील अ‍ॅड. भोसे यांचेही दर 15 दिवसांनी विशेष मार्गदर्शन मिळणार आहे. गावकऱ्यांनी आनंद व्यक्त करत कायद्याची मदत आता गावाच्या दारी आली आहे, अशी भावना व्यक्त केली. न्यायाधीशांच्या प्रत्यक्ष उपस्थितीमुळे गावात उत्साहाचे वातावरण होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अ‍ॅड. दिनेश सदापुरे यांनी तर आभार प्रदर्शन सरपंच हिराकांत उईके यांनी केले.

### अशी मिळणार सुविधा

- कायदेशीर सल्ला पूर्णत: मोफत
- प्रत्येक सोमवार व मंगळवार मार्गदर्शन
- गरजू व गरीब नागरिकांसाठी मोठा दिलासा
- गावातच न्यायालयीन सेवा उपलब्ध

# शिवाजी उच्च माध्यमिक शाळेत स्काऊट गाईड युनिट लीडर सभा

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.25 )** - मोर्शी तालुक्यातील स्काऊट-गाईड युनिट लीडर्ससाठी एक दिवसीय उजळणी वर्ग व सहविचार सभा दिनांक 23 जुलै 2025 रोजी शिवाजी उच्च माध्यमिक शाळा, मोर्शी येथे पार पडली. शिक्षण विभाग, भारत स्काऊट व गाईड अमरावती जिल्हा कार्यालय व मुख्याध्यापक संघाच्या सहकार्याने ही सभा आयोजित करण्यात आली होती.

सभेला शिवाजी शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख, स्काऊट मास्टर सौरभ राजस, जिल्हा संघटक सुभाष आठवले, पंचायत समिती विषयतज्ज्ञ व समन्वयक संध्या वाकेकर, प्रशिक्षक ज्ञानेश्वर टाले, सुरेंद्र सिसट, मुख्याध्यापक दिनेश शर्मा, तसेच ज्येष्ठ स्काऊटर संदीप टिक्कास यांची प्रमुख उपस्थिती होती. या सभेत मोर्शी तालुक्यातील अनेक स्काऊट-गाईड युनिट लीडर्सनी सहभाग घेतला. सभेत युनिट नोंदणी प्रक्रिया, शालेय अभ्यासक्रमाशी स्काऊट-गाईडचे समन्वय, प्रशिक्षण तासिका नियोजन, शासन पुरस्कृत उपक्रम, तसेच राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहभाग यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी अमरावती भारत स्काऊट व गाईड कार्यालयातील उमेश नवरे व रमेश चव्हाण यांनी विशेष मेहनत घेतली. या सभेमुळे तालुक्यातील स्काऊट-गाईड युनिट्समध्ये कामकाज अधिक प्रभावी आणि शिस्तबद्ध पद्धतीने राबवण्याबाबत जागरूकता निर्माण झाली असून, सहभागी शिक्षकांनी अशा उपक्रमांचा वारंवार आयोजन व्हावे, अशी भावना व्यक्त केली.



# पंचायत समिती चांदूर रेल्वेला राज्यात द्वितीय क्रमांकाचा सन्मान

## जिल्हाधिकारी कार्यालयात भव्य सत्कार



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.25 )** - महाराष्ट्र शासनाच्या '100 दिवस कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमे' अंतर्गत राज्यभरातील जिल्हा व तालुकास्तरावरील शासकीय कार्यालयांच्या कार्यप्रदर्शनाचे मूल्यांकन करण्यात आले. या मूल्यांकनामध्ये चांदूर रेल्वे पंचायत समितीने उत्कृष्ट कामगिरी करत संपूर्ण राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय यशाबद्दल अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित भव्य सत्कार समारंभात समितीचा गौरव करण्यात आला. या सत्कार समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. यावेळी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदेचे अधिकारी, लोकप्रतिनिधी व मान्यवरही उपस्थित होते. समारंभात गटविकास अधिकारी संजय खारकर, विस्तार अधिकारी पंचायत सुरेश चव्हाण, अधिक्षक गजेंद्र पाटील आणि स्वच्छ भारत मिशनचे तालुका समन्वयक राहुल गवई यांनी चांदूर रेल्वे पंचायत समितीच्या वतीने प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह स्वीकारले.

या मोहिमेमध्ये कार्यालयीन कार्यपद्धतीतील पारदर्शकता, गती, नागरिक सेवा तत्परता, डिजिटल सेवा, कागदपत्र व्यवस्थापन आणि जनहितस्नेही दृष्टिकोन या निकषांवर समितीची कामगिरी विशेष ठरली. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, माजी पालकमंत्री प्रवीण पोटे, डॉ. नितीन धांडे, इतर आमदार व पदाधिकारी यांनी समितीच्या यशाबद्दल कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. गटविकास अधिकारी संजय खारकर यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले की, हा सन्मान माझा वैयक्तिक नसून, हा आमच्या संपूर्ण कर्मचाऱ्यांचा आणि वरिष्ठांचे मार्गदर्शन लाभलेल्या टीमवर्कचा विजय आहे. आम्ही भविष्यातही हीच गुणवत्ता टिकवून ठेवू. या यशामुळे चांदूर रेल्वे तालुक्याचा आणि अमरावती जिल्ह्याचा गौरव संपूर्ण राज्यात उंचावला असून, पंचायत समिती चांदूर रेल्वेची ही कामगिरी इतर शासकीय कार्यालयांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपींना 20 वर्षांची सक्तमजुरी

**महासागर प्रतिनिधी**

**वरूड, ( दि.25 )** - वरूड पोलिस ठाण्यातील गंभीर स्वरूपाच्या लैंगिक अत्याचार प्रकरणाचा निकाल जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, वरूड यांनी 24 जुलै 2025 रोजी दिला. या प्रकरणात दोन आरोपींना 20 वर्षांची सक्तमजुरी आणि प्रत्येकी 10,000 रुपये दंड सुनावण्यात आला आहे. दंड न भरल्यास सहाच्या महिन्यांची अतिरिक्त शिक्षा ठोठावण्यात आली आहे. रमेश जनार्दन नारनवरे (वय 35, रा. खडका, ता. नरखेड, जि. नागपूर), मंगेश मोरेश्वर देशभ्रतार (वय 31, रा. आष्टी, जि. वर्धा) या प्रकरणातील आरोपी आहे. सदर गुन्हा पोस्टे अप. क्र. 75/2015 नुसार कलम 376(डि) भादंवि, तसेच पॉक्सो कायदा अंतर्गत कलम 5(जी), 6 यांतर्गत नोंदवण्यात आला होता. न्यायालयीन सुनावणीदरम्यान आरोपींविरुद्ध भक्कम पुरावे सादर करण्यात आले. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुबोध वंजारी यांनी अत्यंत दक्षतेने पूर्ण केला. सरकारी वकील घोडेस्वार यांनी प्रभावी युक्तिवाद सादर करत आरोपींना दोषी ठरवण्यात यश मिळवले. कोर्ट पयरवी अधिकारी महिला पोलीस हवालदार पूनम डहाके यांनीही मोठे योगदान दिले. या निकालामुळे पीडितेला न्याय मिळाला असून न्याय व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. पोलिस प्रशासन, सरकारी वकील व पैरवी अधिकाऱ्यांचे या प्रकरणात योगदान उल्लेखनीय ठरले आहे. हा निकाल लैंगिक अत्याचाराविरुद्ध कठोर कारवाईचे उदाहरण ठरत आहे.



# सहकाऱ्यांच्या वाढदिवसानिमित्त अनोखी हिरवी भेट

## वृक्षारोपण आणि फवारणीने साजरा झाला पर्यावरणपूरक वाढदिवस

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, ( दि.25 )** - वाढदिवस म्हटलं की केक, पार्टी आणि जल्लोष ही सामान्य कल्पना असते. मात्र धामणगाव रेल्वे येथील मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांनी याला पर्यावरणपूरक वळण देत एक आगळावेगळा उपक्रम साजरा केला. सहकारी सुधीर शेळके यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी वृक्षारोपण व कीटकनाशक फवारणी करत हिरवा वाढदिवस साजरा केला.

शहरातील सेफला ग्राउंड येथे हा उपक्रम पार पडला. सुधीर शेळके आणि त्यांच्या मित्रपरिवाराने मिळून हा उपक्रम राबवला. वाढदिवस हे आनंदाचे निमित्त असतेच, पण त्याचा उपयोग निसर्गासाठी करता आला तर त्या आनंदाला एक अर्थपूर्ण वळण मिळते, असे विचार शेळके यांनी व्यक्त केले. आज लावलेले हे झाड उद्या अनेकांना सावली देईल, प्राणवायू देईल, हीच खरी भेट आहे, असेही त्यांनी सांगितले. या उपक्रमात गुणवंत बनसोड, संजय शेंडे, माधव गोडे, प्रमोद भगत, किशोर बागवान, आशिष धुरट, गणेश पालीवाल आणि विलास तायडे यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. सर्वांनी मिळून वृक्षारोपण केले आणि परिसरात तणनाशकांची फवारणी केली. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टिकोनातून या अभिनव उपक्रमाने एक वेगळीच छाप समाजमनावर टाकली आहे. वाढदिवसाच्या पारंपरिक साजरीकरणापेक्षा हा उपक्रम पर्यावरणपूरक, सामाजिकदृष्ट्या जाणीवपूर्वक आणि प्रेरणादायी ठरला आहे. या उपक्रमामुळे इतर नागरिकांमध्येही पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत होईल, अशी आशा उपस्थितांनी व्यक्त केली. वाढदिवस साजरा करताना फुलं तोडण्यापेक्षा झाडं लावा, हाच बदल हवाय! असा स्पष्ट संदेश या उपक्रमातून दिला गेला.





### भाईगिरीतून तरुणावर चाकू हल्ला

**अमरावती** - भाईगिरीतून एका तरुणावर चाकूने हल्ला करण्यात आल्याची घटना फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पंचशिलनगरात उघडकीस आली. पंकज रविंद्र रॉय (रा. अमरावती) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी कपील राजु पांडे (रा. अमरावती) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

### घरफोडीत 95 हजाराचा मुद्देमाल लंपास

**अमरावती** - गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वलगाव रोड स्थित रजनी मंगल कार्यालयाजवळ 17 जुलै रोजी एक घरफोडीची घटना उघडकीस आली. चोराने एका घरातून 95 हजाराचा मुद्देमाल लंपास केला आहे. या घटनेची तक्रार प्रकाश तुकाराम काळे (60, रा. अमरावती) यांनी गाडगेनगर पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञाताविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

# वरूड व मोर्शी तालुक्यातील सात ग्रामपंचायतींचा कायापालट निश्चित

## आ. उमेश यावलकर यांच्या पाठपुराव्याला यश | ग्रामविकासासाठी 25 लाखांचा निधी मंजूर

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.25 )** - वरूड-मोर्शी विधानसभा क्षेत्रातील ग्रामपंचायतींचा चेहरामोहरा लवकरच बदलणार आहे. पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियानांतर्गत 2025-26 या वार्षिक आराखड्यानुसार, सात ग्रामपंचायतींना नवीन इमारत व नागरी सुविधा केंद्रासाठी शासनाकडून 25 लाखांचा निधी मंजूर झाला आहे. या योजनेचा लाभ मुख्यत: जुन्या, जीर्ण, धोकादायक स्थितीत असलेल्या किंवा इमारतींचा अभाव असलेल्या ग्रामपंचायतींना दिला जात आहे.




या योजनेसाठी आमदार उमेश यावलकर यांनी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा केला होता. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन, पहिल्या टप्प्यात मोर्शी तालुक्यातील रिद्धपूर, गणेशपूर, तसेच वरूड तालुक्यातील राजूरा बाजार, बेनोडा, लोणी, शहापूर व टेंभुरखेडा या सात ग्रामपंचायतींची निवड झाली आहे. प्रत्येकी 20 लाख रुपये इमारत बांधकामासाठी आणि 5 लाख रुपये नागरी सुविधा खोलीसाठी, असे एकूण 25 लाख रुपये प्रत्येक ग्रामपंचायतीला मिळणार आहेत. इतर ग्रामपंचायतींचे प्रस्तावही प्रक्रियेत असून, लवकरच त्यांनाही मंजुरी मिळणार असल्याची माहिती आमदार यावलकर यांनी दिली. याशिवाय राज्यस्तरावरील %बाळासाहेब ठाकरे मातोश्री ग्रामपंचायत भवन उभारणी योजने अंतर्गत इतर ग्रामपंचायतींसाठीही प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. टप्प्याटप्प्याने संपूर्ण मतदारसंघातील ग्रामपंचायतींना स्वत:चे हक्काचे व सुसज्ज कार्यालय उपलब्ध करून देण्याचा आमदारांचा संकल्प आहे. या निधी मंजुरीबद्दल आ. उमेश यावलकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे आभार मानले असून, ग्रामीण विकासाच्या दिशेने हा महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचे ते म्हणाले.



# दहावी, बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आज

## शोध प्रतिष्ठान अध्यक्ष यश खोडके यांच्या संकल्पनेतून भव्य आयोजन

### दोन हजार विद्यार्थ्यांचा कुंभमेळा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.25 )** - विद्यार्थी हा देशाच्या भवितव्यातील शिल्पकार असून, त्याच्या बौद्धिक व व्यक्तिमत्व विकासासाठी प्रेरणादायी सन्मान आवश्यक आहे, या विचारातून शोध प्रतिष्ठान, अमरावतीच्या वतीने येत्या उद्या 26 जुलै, शनिवार रोजी दुपारी 2 वाजता, श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, मोर्शी रोड, अमरावती येथे दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य गुणगौरव सोहळा पार पडणार आहे.



हा सोहळा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त साजऱ्या होणाऱ्या जनविश्वास सप्ताह चा समारोप ठरणार आहे. या सप्ताहांतर्गत अमरावती जिल्ह्यात 66 हजार वृक्ष लागवड, रक्तदान शिबीर, स्वच्छता मोहीम, गौसेवा, मार्गदर्शन कार्यशाळा, आणि विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले आहेत.

यंदा 2024-25 शैक्षणिक वर्षात दहावी व बारावीच्या परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या सुमारे दोन हजार विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार असून, त्यांना प्रशस्तीपत्रक, गौरवचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले जाईल. शिक्षण, समाजसेवा व सांस्कृतिक क्षेत्रात प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचाही यथोचित गौरव होणार आहे. या कार्यक्रमाला आ.सुलभा खोडके, आ. संजय खोडके यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी शैक्षणिक वाटचालीसाठी उपयुक्त असे मार्गदर्शनही यावेळी करण्यात येणार आहे. या उपक्रमामागे शोध प्रतिष्ठानचे अध्यक्ष यश खोडके यांची दूरदृष्टी आणि विद्यार्थ्यांच्या सक्षमीकरणाचा कर्तृत्ववादी दृष्टिकोन आहे. हा सोहळा अमरावतीच्या शैक्षणिक वारशात एक मोलाची भर घालणार असल्याचे चित्र दिसून येत आहे. या अभूतपूर्व उपक्रमास विद्यार्थी, पालक, शिक्षक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन आमदार सुलभा संजय खोडके यांनी केले आहे.

# त्या तरुणाचा वाघाच्याच हल्ल्यात मृत्यू

## बारुखेडा जंगलात बेपत्ता झालेल्या युवकाचा मृतदेह सापडला; परिसरात भीतीचे सावट



**महासागर प्रतिनिधी**

**धारणी (दि. 25)** - बारुखेडा गावाजवळील जंगलात काही दिवसांपूर्वी बेपत्ता झालेल्या युवकाचा मृतदेह अखेर शुक्रवारी आढळून आला. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, वाघाच्या हल्ल्यात या युवकाचा मृत्यू झाल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

### दोन युवक बेपत्ता — एकाचा मृतदेह सापडला

बारुखेडा गावाच्या जंगल परिसरात दोन युवक अचानक बेपत्ता झाले होते. त्यापैकी एक तरुण सुखरूप सापडला, तर दुसऱ्याचा शोध पोलीस व वनविभागाच्या संयुक्त प्रयत्नांनंतर यशस्वी झाला, मात्र दुर्दैवाने मृतावस्थेत.

### शोध मोहिमेत यश

पोलीस निरीक्षक अवतारसिंग चव्हाण यांच्या नेतृत्वात शोध मोहिम सुरू करण्यात आली होती. वनविभागाचे अधिकारी आणि स्थानिक कर्मचाऱ्यांनीही त्यात सहभाग घेतला. सलग काही दिवसांच्या प्रयत्नानंतर शुक्रवारी जंगलात मृतदेह सापडला. त्याच्या स्थितीवरून आणि आजूबाजूच्या परिस्थितीवरून वाघाच्या हल्ल्याचा संशय बळावतो.

### वाघाच्या हल्ल्याची शक्यता ठोस

मृतदेहाची स्थिती भीषण, जखमांच्या स्वरूपावरून वाघाच्या हल्ल्याची शक्यता. जंगल परिसरात वाघाचे हालचाल आधीही दिसून आल्या होत्या. वनविभागाकडून गस्त वाढवण्यात आली आहे.

> 'नातेवाईकांच्या तक्रारीनंतर रामसिंगचा शोध दररोज सुरू होता. अखेर शुक्रवारी बारुखेडा जंगलात त्याचा मृतदेह आढळून आला. मृतदेहाची ओळख त्याच्या सोबत असलेल्या युवकाने अंगावरील कपडे व टॉर्चवरून पटवली.
>
> **अवतारसिंग चव्हाण, पोलीस निरीक्षक, धारणी**

### आमदार केवलराम काळे यांची तत्काळ मदत

घटना समजताच आमदार केवलराम काळे यांनी वनविभागाशी संपर्क साधून कुटुंबीयांना तात्काळ आर्थिक मदतीचे निर्देश दिले. मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना हवी, अशी त्यांची मागणी.

### स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण

या दुर्घटनेनंतर बारुखेडा व आजूबाजूच्या परिसरात भितीचे सावट पसरले आहे. नागरिकांना जंगलाजवळ सतर्कतेने वावर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अनेकांनी वनविभागाकडे जंगलात बंदोबस्त वाढवण्याची मागणी केली आहे.

### वनविभागाची कार्यवाही सुरू

वनविभागाच्या पथकांनी जंगल परिसरात गस्त वाढवली आहे. वाघाच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे व पिंजरे लावण्याची शक्यता आहे.

# दहीगाव शेतात महिलेचा विजेचा शॉक लागून मृत्यू

**महावितरणच्या हलगर्जीपणाचा बळी | संतप्त ग्रामस्थांनी मृतदेह आणला थेट कार्यालयात!**




**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी (दि. 25)** - दहीगाव रेचा येथील शेतशिवारात शुक्रवारी (दि.25) दुपारी विजेच्या तुटलेल्या जिवंत तारेला स्पर्श होऊन एका मजूर महिलेचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. महावितरणच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याचा आरोप करत संतप्त ग्रामस्थांनी मृतदेह थेट महावितरण कार्यालयात आणत जोरदार आंदोलन छेडले. अखेर पोलिस हस्तक्षेप आणि संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करून अटकेनंतर जमाव शांत झाला.

मृत महिला रुपाली शुद्धोधन सावळे (31, रा. दहीगाव रेचा) या रोजंदारीवर अरुण टकोरे यांच्या शेतात मजुरीस गेल्या होत्या. दुपारी लघुशंकेसाठी आडोश्यास जात असताना तुटलेल्या जिवंत विद्युत तारांचा संपर्क आल्याने त्या जागीच कोसळल्या. घटनेनंतर गावकऱ्यांनी संतप्त होत मृतदेह घेऊन महावितरण कार्यालयावर मोर्चा नेला. त्यांनी 'सदोष मनुष्यवध' अंतर्गत गुन्हा दाखल करून संबंधित अभियंता बी.एस. जाधव व कर्मचाऱ्यांवर अटक करण्याची जोरदार मागणी केली. जमावाचा तणाव लक्षात घेता पथ्रोट व रहिमापूर पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. घटनेची गंभीरता ओळखून आमदार गजानन लवटे, तसेच शशिकांत मंगळे, शंकर मालठाणे, रमेश सावळे, बाळा शेरेकर, बाळु रोंघे, शंभू मालठाणे यांनी समेट साधत गावकऱ्यांना आश्वासन दिले. तत्काळ मदत म्हणून महावितरणकडून 20 हजार आणि आमदार लवटे यांच्याकडून 20 हजार रुपये असे एकूण 40 हजार रुपयांची तातडीची मदत मृतकाच्या नातेवाईकांना देण्यात आली. याशिवाय शासन नियमांनुसार आर्थिक मोबदला मिळवून देण्यासाठी प्रस्ताव कार्यकारी अभियंता अचलपूर यांच्यामार्फत तातडीने पाठविण्यात येईल, तसेच दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिल्यानंतर ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेतले. मृतक रुपालीच्या पाठीमागे दोन लहान मुले असून, आईच्या अचानक जाण्याने ते पोरके झाले आहेत. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण दहीगाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# अल्पवयीन मुलीच्या आत्महत्येप्रकरणी युवक अटकेत

**पाठलाग व मानसिक त्रासाचा आरोप**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 25) :** दहावीत शिकणाऱ्या 15 वर्षीय अल्पवयीन मुलीने गळफास लावून आत्महत्या केल्याच्या प्रकरणात गाडगेनगर पोलिसांनी एका युवकाला अटक केली आहे. मुलीच्या नातेवाइकांचा आरोप आहे की, संबंधित युवक सतत पाठलाग करीत होता आणि मानसिक त्रास देत होता. याच त्रासाला कंटाळून मुलीने टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप करण्यात आला आहे.

आरोपीचे नाव अभिषेक उर्फ गोलू जनार्धन पवार (वय 24, रा. रमाबाई आंबेडकरनगर) असे असून, त्याच्याविरोधात आत्महत्येस प्रवृत्त करणे, ॲट्रॉसिटी, आणि पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

24 जुलै रोजी दुपारी गाडगेनगर परिसरात ही घटना घडली. घरात एकटी असताना 15 वर्षीय मुलीने गळफास लावून आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला व मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठविला. सायंकाळी मृत मुलीच्या नातेवाइकांनी गाडगेनगर पोलिस ठाण्यावर धडक दिली आणि आरोपी अभिषेक पवारवर गंभीर आरोप करत कारवाईची मागणी केली. त्यांच्या म्हणण्यानुसार, आरोपी मुलीचा सतत पाठलाग करत होता, जबरदस्तीने बोलण्याचा प्रयत्न करत होता व तिला मानसिक त्रास देत होता. या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी रात्री उशिरा गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली. 25 जुलै रोजी त्याला न्यायालयात हजर केले असता, त्यास एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

# संविधानाचे अभिप्रेत मूल्य टिकविण्यासाठी न्याय व्यवस्था कटिबद्ध

**सरन्यायाधीश न्या. भूषण गवई | दर्यापूर येथील न्यायालयीन इमारतीचे उद्घाटन**









**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 25)** - स्वातंत्र्य, समता आणि बंधुता हे भारतीय संविधानाचे आणि लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत. या संविधानाचे अभिप्रेत मूल्य टिकविण्यासाठी न्याय व्यवस्था कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी केले.

दर्यापूर येथील न्यायमंदीर, जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय, वरिष्ठस्तर या नूतन न्यायालयीन इमारतीच्या कोनशीलेचे अनावरण आज सरन्यायाधीश न्या. भूषण गवई यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरन्यायाधीशांनी इमारतीची पाहणी केली.

या उद्घाटन सोहळ्याला खासदार बळवंत वानखडे, आमदार गजानन लवटे, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अनिल किलोर, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रवीण पाटील, दर्यापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष धमेंद्र आठवले, जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा तसेच दर्यापूर जिल्हा न्यायाधीश-1 व अतिरिक्त सत्र न्यायाधीश सत्यवान डोके आदी यावेळी उपस्थित होते.

सरन्यायाधीश न्या. भूषण गवई म्हणाले, दर्यापूर येथील न्याय मंदीराचे उद्घाटन ही घटना माझ्यासाठी विशेष आनंदाची आहे. मी मूळचा दारापूरचा असल्यामुळे माझ्यासाठी ही अभिमानाची व समाधानाची बाब आहे. मी या कार्यक्रमाला सरन्यायाधीश म्हणून आलो नसून एक ग्रामस्थ म्हणून आलेलो आहे. या नवीन न्यायालयीन इमारतीमुळे तसेच सुसज्ज यंत्रणेमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना लवकर न्याय मिळेल. न्यायदानाचे कार्य कोणताही पूर्वग्रहदूषित भाव न बाळगता करावे लागते, म्हणून खऱ्या अर्थाने हे एक पवित्र कार्य आहे. दर्यापूर तालुक्याने आजवर अनेक नामवंत व्यक्ती दिल्या आहेत. यामुळे हा तालुका सदैव अग्रेसर राहिलेला आहे.

न्याय व्यवस्था ही लोकशाहीचा प्राण आहे. यामुळे संविधानाला आदर्श मानून न्यायदानाचे कार्य करावे. या क्षेत्रात अनुभव अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. न्यायाधीश आणि वकील यांचे संबंध सलोख्याची असावे. शासनाने अनेक महत्त्वपूर्ण कायदे लागू केले आहेत. महिला सबळीकरण कायद्यान्वये स्त्रियांना त्यांचा हक्क मिळत आहे. उत्तम न्याय व्यवस्थेमुळे आज आपला देश प्रगतीपथावर आहे. राज्यघटनेचे मौलिक अधिकार आणि जबाबदारी याचे योग्य पालन होणे गरजेचे असल्याचे सरन्यायाधीश न्या. भूषण गवई यावेळी म्हणाले.

दर्यापूर सत्र न्यायालय कार्यक्षेत्रात दर्यापूर व अंजनगाव ही कार्यक्षेत्र येतात. या नूतन इमारतीमध्ये दर्यापूर आणि अंजनगाव येथील जिल्हा सत्र न्यायालयाची प्रकरणे (दिवाणी व फौजदारी )या न्यायालयात चालतील. 28.54 कोटी रुपये निधी खर्चून या सुसज्ज आणि भव्य इमारतीचे बांधकाम करण्यात आले. न्यायमंदीराची इमारत चार मजली असून तळमजल्यावर पार्किंग, तीन मजल्यांवर 5 न्यायालय कक्ष, इतर विभाग व एक सभागृह आहे. प्रत्येक मजल्यावर पक्षकार व आरोपींना बसरण्याची सुविधा आहे. अद्यावत संगणक कक्ष व सर्व्हर रुम आहेत. इमारतीच्या मागील बाजूस पार्किंगमधून रॅम्पची सुविधा आहे. नवीन न्यायालयीन इमारतीमुळे परिसरातील नागरिकांना न्याय मिळण्याची प्रक्रिया अधिक सुकर होईल.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यार्लगड्डा यांनी केले. संचालन न्यायाधीश हितेश सोनार आणि न्यायाधीश रोहिणी मनोरे यांनी केले तर आभार अतिरिक्त सत्र न्यायाधीश सत्यवान डोके यांनी मानले.

# निवृत्तीनंतर कोणतेही शासकीय पद स्वीकारणार नाही!



## सरन्यायाधिश भूषण गवई यांची घोषणा

## दारापूर भेटीत गावकऱ्यांशी भावनिक संवाद

## पुढील आयुष्य गावात घालवण्याचा निर्णय





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.25)**- भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांनी आज त्यांचे जन्मगाव दारापूर येथे भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी निवृत्तीनंतर कोणतेही शासकीय पद स्वीकारणार नाही, अशी स्पष्ट भूमिका घेतली. तसेच निवृत्तीनंतर दारापूर, अमरावती आणि नागपूर येथेच जास्तीत जास्त वेळ घालवण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली.

न्यायमूर्ती गवई यांनी 14 मे 2025 रोजी भारताचे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारला होता. त्यांचा कार्यकाळ 23 नोव्हेंबर 2025 पर्यंत आहे. यानंतर काय? या प्रश्नावर त्यांनी स्पष्ट भूमिका घेत निवृत्तीनंतर कोणतेही शासकीय लाभाचे पद स्वीकारणार नाही असे ठामपणे सांगितले. दारापूर येथे त्यांचे वडील रा. सु. उपाख्य दादासाहेब गवई यांच्या 10व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमासाठी सरन्यायाधीश गवई उपस्थित होते. यावेळी त्यांनी वडिलांच्या स्मृतीस्थळाला पुष्पांजली अर्पण करून त्यांना आदरांजली वाहिली. सरन्यायाधीश झाल्यानंतर ही त्यांची पहिलीच गावभेट होती, त्यामुळे गावात उत्साहाचे वातावरण होते. अनेक ग्रामस्थांनी त्यांचे स्वागत केले. गावातील भेटीदरम्यान त्यांनी आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. गावातील घर, शाळा आणि गल्लीबोळ पाहून ते भावूक झाले. उपस्थितांना संबोधित करताना त्यांनी मराठीत सांगितले, मी रिटायर झाल्यानंतर कोणतेही शासकीय पद घेणार नाही. माझा हेतू आहे की मी उर्वरित आयुष्य दारापूर, अमरावती आणि नागपूरमध्ये शांतीने घालवावा. न्यायव्यवस्थेतील वरिष्ठ पदांवरून निवृत्त झाल्यानंतर काही वेळा संबंधित व्यक्तींना शासकीय पद दिले जाते.

यामुळे न्यायव्यवस्थेच्या स्वायत्ततेवर प्रश्न उपस्थित होतात. मात्र सरन्यायाधीश गवई यांनी याच बाबतीत स्पष्ट भूमिका घेत पारदर्शकता आणि नि:पक्षपातीपणाचे उदाहरण ठेवले आहे. त्यांच्या या निर्णयाचे अनेक स्तरांवरून स्वागत होत आहे. ग्रामीण भागाशी असलेली त्यांची नाळ आणि साधेपणाने जगण्याची भूमिका ही आजच्या काळात आदर्शवत ठरत आहे.

# ट्रॅव्हल्सच्या धडकेत दोघे जखमी

**अमरावती :** ट्रॅव्हल्सच्या धडकेत दोघे जखमी झाले. ही घटना नांदगाव पेठ ठाण्याच्या हद्दीत 22 जुलै रोजी रात्री घडली. सत्यवान बख्तार व डुंगरसिंग राजगुरु अशी जखमींची नावे आहेत. सत्यवान व डुंगरसिंग हे दोघे आपल्या वाहनाने अमरावतीकडे जात होते. मार्गात ट्रॅव्हल्सने त्यांच्या वाहनाला धडक दिली. या अपघातात ते दोघे जखमी झाले. या प्रकरणी सत्यवान बख्तार यांनी नांदगाव पेठ ठाण्यात तक्रार दाखल केली.

# कीटकनाशक फवारणीच्या विषारी औषधामुळे शेतकऱ्याचा मृत्यू

**नांदगावपेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कुंभारवाडा येथील घटना**

**अमरावती, दि. 25 :** नांदगावपेठ परिसरातील कुंभारवाडा येथील शेतकऱ्याचा कीटकनाशक फवारणी करताना विषारी द्रव्य तोंडात गेल्याने उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना 24 जुलै रोजी घडली. विनोद भाऊराव सावरकर (वय 55, रा. कुंभारवाडा, नांदगावपेठ) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, 23 जुलै रोजी सकाळी 9 वाजता विनोद सावरकर हे त्यांच्या शेतात कीटकनाशक 'राउंडअप' या विषारी औषधाची फवारणी करत होते. दिवसभर फवारणी करून सायंकाळी 4 वाजता घरी परतल्यानंतर त्यांना उलट्या होऊ लागल्या. प्रकृती खालावल्याने त्यांना मुलाने तत्काळ जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान दुसऱ्या दिवशी म्हणजे 24 जुलै रोजी त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर नांदगावपेठ पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेऊन पुढील तपास सुरू केला आहे.

# शहरातील अनधिकृत मास विक्रेत्यांवर महापालिकेची कारवाई

## एक ट्रक साहित्य जप्त



**अमरावती** - शहरात अनधिकृतपणे मास विक्री करणाऱ्यांवर आज अमरावती महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने मोठी कारवाई केली. दस्तुरनगर ते एमआयडीसी टी-पॉईंट रस्ता, तसेच माया नगर व गोपाल नगर परिसरात सकाळी 11.30 ते दुपारी 2.30 दरम्यान ही कारवाई करण्यात आली. सदर भागात काही मटन विक्रेत्यांनी कच्च्या स्वरूपातील अनधिकृत गुऱ्हाळे उभारून सार्वजनिक ठिकाणी मास विक्री सुरू केली होती. यामुळे परिसरात दुर्गंधी, अस्वच्छता तसेच रहदारीस अडथळा निर्माण होत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी नोंदवल्या होत्या. या पार्श्वभूमीवर पशुशल्य चिकित्सक डॉ. सचिन बोंद्रे आणि अतिक्रमण पथक प्रमुख श्याम चावरे यांच्या समन्वयाने महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने संयुक्त कारवाई केली. या कारवाईत अनधिकृत टेबल, खुर्च्या, लोखंडी पिंजरे, काउंटर आदी साहित्य जप्त करून एक ट्रक भरून मनपाच्या कोठाव्यात जमा करण्यात आले. महापालिकेने अशा प्रकारच्या अनधिकृत विक्रेत्यांवर कारवाई सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

# प्राचार्यांचे निवृत्ती वय 65 करण्यासाठी सरकार सकारात्मक

**उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 25)** - नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनइपी-2020) प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी प्राचार्य व प्राध्यापकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, त्यांचे निवृत्तीचे वय 62 वरून 65 वर्षे करण्याचा निर्णय लवकरच मंत्रिमंडळ बैठकीत घेतला जाईल, अशी ग्वाही उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली आहे.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात पार पडलेल्या अखिल महाराष्ट्र फेडरेशन ऑफ प्रिन्सिपल असोसिएशन ऑफ नॉन-गव्हर्नमेंट कॉलेजेसच्या 40व्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी आमदार किरण सरनाईक, हर्षवर्धन देशमुख, डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, डॉ. मिलिंद बारहाते, संचालक शैलेंद्र देवळाणकर आदी मान्यवर उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले की, भारत हा सर्वात मोठ्या तरुण लोकसंख्येचा देश असून, पारंपरिक शिक्षणापेक्षा व्यावसायिक आणि प्रात्यक्षिक-आधारित शिक्षणावर भर देण्याची गरज आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना संशोधन, एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता), मातृभाषेतील शिक्षण व उद्योग प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होतील. 2047 पर्यंत भारताचा सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी शिक्षण क्षेत्रातून सक्षम युवा पिढी घडविणे आवश्यक आहे. यासाठी सरकार शिक्षणसंस्थांना सर्वतोपरी मदत करेल, असे त्यांनी नमूद केले. मुलींसाठी सरकार पहिली ते पदवीपर्यंत मोफत शिक्षण पुरवित असून, 842 अभ्यासक्रमांचे शुल्क माफ करण्यात आले आहे. त्यामुळे 53 हजार मुलींनी व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतला, हे विशेष.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकारातून 5,500 प्राध्यापक व 2,900 शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती होणार आहे. तसेच 1993 पासून प्रलंबित असलेला एमफील/नेट/सेट अट हटवण्यासंदर्भात 1,000 कोटी रुपयांचा निधी वितरित केला जाईल. असोसिएट प्राध्यापक ते प्राध्यापक पदोन्नतीचा प्रश्नही लवकर सोडवण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. अधिवेशनाच्या निमित्ताने स्मरणिकेचे विमोचन आणि 'आय हेल्प' पोर्टलचे उद्घाटन देखील मंत्री पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# देशाच्या शूर सैनिकांच्या बलिदानाच्या तुलनेत आपण कुठे आहोत?



कारगिल विजय दिवस विशेष

२६ जुलै २०२५

देशाचे शूर सैनिक हे देशाचा अभिमान आहेत, जे देशाच्या रक्षणासाठी नेहमीच कर्तव्यपथावर तैनात असतात. कोणत्याही प्रकारची आपत्ती किंवा संकट आले तरी ते घाबरत नाहीत; कडक ऊन असो किंवा गोठवणारी थंडी असो, घनदाट जंगले असोत, उंच पर्वत असोत किंवा पावसाळी वादळ असोत, देशाचा सैनिक आपली भूमिका अतिशय चांगल्या प्रकारे बजावतो. अनेक परिस्थितीत, उपाशी आणि तहानलेले राहून, गैरसोयींशी झुंजून, मृत्यू समोर पाहूनही, ते सैनिक कधीही मागे हटत नाहीत, सैनिक कर्तव्याच्या आणि देशाच्या रक्षणासाठी शहीद होतात. देशाच्या शूर सैनिकांबद्दल आपल्याला जो आदर, सन्मान आणि अभिमान आहे, तोच आदर देशाच्या शूर सैनिकांनाही आपल्याबद्दल आहे का?

---------------

देशात दररोज नवीन वाद आणि नवीन समस्या उद्भवताना दिसतात. गंभीर गुन्ह्यांचा आलेख इतका वेगाने वाढत आहे की लहान मुले देखील त्यात सक्रिय असल्याचे दिसून येते. आता, नातेसंबंधांना कलंकित करणाऱ्या घटना जवळजवळ दररोज पाहायला आणि ऐकायला मिळतात.

लोकांसाठी आता माणुसकी, प्रतिष्ठा, शुद्धता, सत्यता, कर्तव्यनिष्ठा, विश्वासार्हता, सहिष्णुता, स्वाभिमान यासारखे शब्द त्यांचे मूल्य गमावून बसले आहेत आणि त्यांची जागा लोभ, द्वेष, आक्रमकता, फसवणूक, खोटेपणा, ढोंग, भ्रष्टाचार, खुशामत, अश्लीलता, देखावा, शब्द आणि कृतीतील तफावत आणि स्वार्थ यांनी घेतली आहे.

प्रत्येकजण स्वतःच्या स्वार्थासाठी पर्यावरण, समाज आणि देशाचा विनाकारण नाश करण्याचा प्रयत्न करत आहे. देशातील लोकांची अशी परिस्थिती पाहून सीमेवर तैनात असलेल्या शूर सैनिकांना काय वाटत असेल? शूर सैनिकांसारखे जगण्याचा विचार कधी लोकांच्या मनात येत नाही का?

१९९९ च्या कारगिल युद्धात भारताने पाकिस्तानवर मिळवलेल्या विजयाच्या स्मरणार्थ दरवर्षी २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस साजरा केला जातो. पाकिस्तानी सैन्याने ताब्यात घेतलेला भारतीय भूभाग परत मिळवण्यासाठी लढलेल्या भारतीय सैनिकांच्या शौर्य आणि बलिदानाचा हा दिवस सन्मान करतो. हा दिवस भारताच्या सार्वभौमत्वाचे आणि अखंडतेचे रक्षण करण्याच्या दृढनिश्चयाचे प्रतीक आहे.

कारगिल विजय दिवस हा राष्ट्रीय अभिमानाचा आणि भावी पिढ्यांना शौर्य आणि बलिदानाच्या सत्यकथांनी प्रेरित करण्याचा दिवस आहे. देशातील असे विजय दिवस आपल्याला प्रत्येक क्षणी प्रेरणा देतात आणि देशाची सुरक्षा भारतीय सैनिकांच्या हातात सुरक्षित आहे याचा आपल्याला अभिमानही वाटतो.



डॉ. प्रितम भी. गेडाम
८२३७४ १७०४१
prit00786@gmail.com

पण त्या तुलनेत, जेव्हा आपण आपल्या सभोवतालचे वातावरण पाहतो तेव्हा, आश्चर्य वाटते की आपल्यासारख्या स्वार्थी लोकांच्या रक्षणासाठी सैनिक सीमेवर इतका त्रास सहन करतो का?

५ वर्षांच्या निवडणुकांनंतर, नेते पुन्हा जनतेत जातात आणि अभिनय करायला लागतात आणि निवडणुका संपताच ते पूर्वीसारखे होतात. अनेक नेते निवडणूक प्रचारादरम्यान सामान्य लोकांच्या घरी, शेतात आणि कामाच्या ठिकाणी जाऊन त्या लोकांचा कामात मदत करताना माध्यमांमध्ये दिसतात.

जनता भोळी म्हणावी की मूर्ख, ज्या नेत्याला जनता आपला प्रतिनिधी म्हणून निवडते आणि जनतेच्या कल्याणासाठी ५ वर्षांच्या कार्यकाळासाठी उच्च पदांवर बसवते, जर तो नेता योग्य धोरणांसह लोककल्याणकारी कामे करण्यात अपयशी ठरला तर त्याला निवडून देणारे लोक स्वतः त्या नेत्याकडून उत्तरे मागण्यास घाबरतात.

आज किती लोक त्यांच्या नेत्याकडून, खासदार, आमदार, नगरसेवक किंवा त्यांच्या क्षेत्रातील संबंधित लोकप्रतिनिधींना प्रश्न विचारतात किंवा उत्तरे मागतात? नेता जितका उच्च पदावर असेल तितका तो जनतेला जास्त जबाबदार असतो. जर देशाचे नेते शूर सैनिकांप्रमाणे पूर्ण प्रामाणिकपणा आणि देशभक्तीने त्यांच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये पार पाडत असतील तर देशात कोणतीही समस्या उद्भवणार नाही.

माझ्या आयुष्यातील एक छोटासा अनुभव आपण सर्वांसोबत शेअर करत आहे. मी महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना, राष्ट्रीय कॅडेट कॉर्प्सचा देखील विद्यार्थी होतो. त्या वेळी, आम्ही एनसीसी विद्यार्थी कॅम्पमध्ये जायचो आणि खूप काही शिकायचो. डिसेंबर-जानेवारीच्या थंडीत जंगलातील त्या कॅम्पमध्ये, प्रत्येक विद्यार्थ्याला रात्री २ तास तंबूबाहेर सुरक्षा ड्युटीवर लावायचे.

मग पहाटे १ वाजले किंवा ३ वाजले तरी, विद्यार्थ्याला झोपेतून उठावे लागायचे, पूर्ण गणवेश घालून, तयार होऊन तंबूबाहेर संत्री म्हणून ड्युटी करावी लागायची. २५ किमी सतत जंगल ट्रेकिंग करणे, दररोज आपआपल्या तंबूच्या जमिनीवर शेणाचा लेप लावणे, किल्ला बनविणे, विविध स्पर्धांमध्ये भाग घेणे. पहाटे ५ वाजता उठणे, तयार होऊन रिपोर्टिंग करणे, तक्रार न करता दररोज आपले सर्व काम स्वतः करणे. वेळेवर नाश्ता, दुपारचे जेवण आणि रात्रीचे जेवण उघड्या गवताळ जमिनीवर बसून करणे.

दिवसभराच्या कामामुळे शरीर इतके थकून जायचे की झोपताच गाढ झोप येत असे. अगदी थोडीशी चुकीसाठी ही कठोर शिक्षा भोगावी लागायची. देशाच्या कानाकोपऱ्यातील विद्यार्थी त्यांच्या विविध कला आणि कौशल्यांचे प्रदर्शन करायचे. टीमवर्क, सद्भावना, देशभक्ती, तत्परता, निष्ठा, समर्पण, कठोर परिश्रम आणि शिस्त यांचा एक अनोखा संगम पाहायला मिळायचा आणि मला त्याचा भाग असल्याचा अभिमान वाटायचा. त्या दिवसांनी मला आयुष्यात खूप काही शिकवले. जीवनात नियम आणि शिस्त खूप महत्त्वाची आहे.

समस्यांचे मूळ समजून घेण्याऐवजी, लोक बाह्य स्वरूप पाहून किंवा खोट्या देखाव्यांना बळी पडून आणि स्वतःच्या कल्पना तयार करून समस्या वाढवतात. प्रत्येकासाठी दर्जेदार शिक्षण, प्रगत आरोग्य सुविधा आणि पात्रतेनुसार रोजगार किंवा व्यवसाय सेवा ही एका मजबूत देशाची वैशिष्ट्ये आहेत.

आपल्या जीवनातील मूलभूत गरजांशी संबंधित समस्यांची जाणीव न ठेवता, आपण निरुपयोगी गोष्टींवर लक्ष केंद्रित करतो आणि आपापसात भांडतो, ज्यांचा आपल्या जीवनाशी काहीही संबंध नसतो. विश्वास बसत नाही पण आपल्या समाजात अशा घटना घडत आहेत जिथे ८- ११ वर्षांच्या मुलांना ४-५ वर्षांच्या चिमुकल्या मुलींवर बलात्कार केल्याचे आढळून येत आहे. अनेक पालकांना मुलांसोबत किंवा मुलांसमोर कसे वागावे हे देखील माहित नसते.

मोबाईल, सोशल मीडिया आणि फॅशनने मुलांचे बालपण आणि निरागसता हिरावून घेतली आहे. शूर शहीद सैनिक, महापुरुष, क्रांतिकारी देशभक्त, समाजसुधारक, शूर राजे आणि सम्राटांच्या प्रेरणादायी गाथा जाणून घेण्याऐवजी, आजकाल आपण चित्रपट तारे, ऑनलाइन गेम, टाईमपास मनोरंजन, अश्लीलता पाहण्यात आणि जाणून घेण्यात आपला मौल्यवान वेळ वाया घालवतो.

फक्त जिभेच्या लालसेपोटी लोक अस्वास्थ्यकर अन्न पसंत करतात. मानवी आळस, व्यसन, प्रदूषण आणि भेसळ यामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य कमकुवत झाले आहे, पण लोक याला महत्त्व देत नाहीत, जी सर्वात महत्वाची गोष्ट आहे.

स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिनासारख्या दिवसासाठी सामान्य लोकांमध्ये देशभक्ती जागृत होते. आपण खूप तिरंगी झंडे खरेदी करतो आणि फिरतो, रॅली काढतो, देशभक्ती गाण्यांमध्ये मग्न होतो, खूप आनंद घेतो आणि दुसऱ्या दिवशी आपल्याला ते तिरंगा आपल्या आजूबाजूच्या रस्त्यांवर, कचऱ्यात, सर्वत्र वाईट स्थितीत पडलेले आढळतात.

देशाच्या तिरंगा ध्वजाला इतके स्वस्त बनवू नका की त्याच्याशी खेळण्यासारखे खेळल्यानंतर तो दुसऱ्या दिवशी कचऱ्यात सापडेल. ध्वजाची किंमत पैशात नाही तर सन्मानात आहे, ज्याची काहीही किंमत असू शकत नाही, ते अनमोल आहे. या राष्ट्रीय झेंड्याचा रक्षणासाठी आणि सन्मानासाठी एक शूर सैनिक आपले प्राण अर्पण करतो, मग त्या सैनिकाच्या तुलनेत आपण कुठे आहोत?

कोणत्या परिस्थितीत, किती त्याग, संघर्ष आणि बलिदानानंतर आपल्याला स्वातंत्र्याचा हा दिवस साजरा करायला मिळाला, याची जाणीव कधी आपल्या मनाला होते का? स्वातंत्र्यासाठी, असंख्य लोकांनी आपले सर्वस्व गमावले जेणेकरून आपण हा दिवस पाहू शकू. देशातील प्रत्येक नागरिक, मग तो नेता असो वा सामान्य कर्मचारी, मालक असो वा नोकर, व्यापारी असो वा कामगार, प्रत्येकाने आपल्या आयुष्यातील काही वर्षे सैनिक म्हणून देशाची सेवा करण्यासाठी दिली पाहिजेत, जेणेकरून आपण सर्वांना शिस्त, देशभक्ती आणि कर्तव्यनिष्ठेचा खरा अर्थ समजेल.

# कोकाटेंबद्दल सरकार एवढे लाचार का?

राज्यातील काही आमदार, मंत्री व राजकीय कार्यकर्त्यांनी कायद्यांचे उल्लंघन करून संपूर्ण हद्द पार केल्याचे दिसून येते. यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी सुध्दा चिंता व्यक्त केली आहे. अशा घटना वारंवार होत राहिल्या तर आमदार माजले असे लोक म्हणतील... असे सुचक विधान त्यांनी विधानभवन परिसरात झालेल्या हाणामारीच्या घटनेनंतर केले होते.

या अगोदर संजय गायकवाड यांनी विधानभवन कॅन्टीन व्यवस्थापकाला मारहाण केली. आता कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांच्या समस्येकडे पाठ फिरवून रमी खेळण्यात व्यस्त आहेत. कोकाटे नेहमीच वादाच्या भोवऱ्यात राहिले आहेत, तरी सरकार व पक्ष त्यांच्या पाठीशी उभे आहेत हे कसे काय? ही बाब राज्याच्या १४ कोटी जनतेच्या समजण्या पलिकडील आहे.

राज्यात पावसाच्या लहरीपणामुळे शेतकरी चिंतेत आहेत आणि मंत्री कोकाटे रमी खेळण्यात गुंग. राज्यातील शेतकरी दररोज कुठे ना कुठे आत्महत्या करीत आहे, शेतकऱ्यांजवळ शेती वाहण्यासाठी बैल नाही हे सुद्धा महाराष्ट्रासह संपूर्ण देशानी पाहिले, शेतकरी जमीनीने व मनाने करोडपती असुन सुद्धा पैशांनी शुन्य आहे. शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शाळेत जाण्यासाठी पुलाची व्यवस्था नाही, भर पावसात झाडांच्या फांद्यांवरून चढून शाळेत जावे लागते अशा अनेक जटील समस्या राज्यापुढे आहेत,

शेतकऱ्यांच्या मुलभूत व अती आवश्यक सेवांकडे दुर्लक्ष करून रमी खेळने म्हणजेच जुगार खेळण्यात राज्याचा कृषी मंत्री कोकाटे व्यस्त असतो, ते ही सभागृहात चर्चेदरम्यान याला काय म्हणावे? आणि अशा कृत्याबद्दल अजून पर्यंत त्यांचा राजीनामा सुध्दा सरकारने मागितला नाही किंवा कठोर कारवाई सुध्दा केली नाही. म्हणजेच सरकारला अश्याच लोकांची गरज आहे का? असाही प्रश्न उपस्थित होतो.

पूर्वी देशाचे राजकारण महाराष्ट्रातून चालायचे. आता तर महाराष्ट्राला राजकीय पुढाऱ्यांनी संपूर्णपणे कलंकित केले आहे. पूर्वी युपी-बिहारीमध्ये गुंडाराज चालायचा असे म्हटल्या जायचे. परंतु आता तर महाराष्ट्रात गुंडाराज विधानभवन परिसरात दिसून येत आहे आणि जबाबदार कोकाटे सारखे मंत्री रमी सारखे जुगार खेळण्यात मग्न आहेत. यामुळे राज्याच्या जनतेला काय मॅसेज जाईल व हे मंत्री काय जनतेचे व शेतकऱ्यांचे सेवा करेल? हा गहण प्रश्न उपस्थित होतो.

जी व्यक्ती शासनाला भिकारी म्हणते यावरून त्यांची मानसिकता किती खालच्या दर्जाची असेल हे आपण समजू शकतो. तरीही सरकार शांत आहे हे कसे काय? या अगोदर सुध्दा शेतकऱ्यांबद्दल घृणास्पद आणि बेजबाबदार वक्तव्य केले होते. म्हणजे अनेकदा शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळुन ठेच पोहचवणारे, शासनाला कमजोर करणारे आणि राज्याच्या १४ कोटी जनतेची अवहेलना करणारे माणिकराव कोकाटेंना सरकार अभय का देत आहे?

ही अत्यंत शरमेची व लाजिरवाणा बाब आहे असे मी समजतो. राज्याची जनता, शेतकरी व प्रशासन यांच्या विरुद्ध वारंवार अवहेलना करणारे वक्तव्य करणाऱ्या कोकाटेंना मंत्री पदावरून व आमदारकी पदावरून ताबडतोब बरखास्त करायला पाहिजे होते.

आपण म्हणतो की गुन्ह्याला माफी नाही. परंतु शेतकऱ्यांचा, राज्याच्या जनतेचा व सरकारचा मोठा अपमान करणारा गुन्हेगार कोकाटे आहे हे माहीत असुन सुद्धा मंत्री पदावर विराजमान आहे.

म्हणजेच सरकार व कोकाटेंचा पक्ष गुन्हेगाराला एकावर-एक माफ करतांना दिसत आहे ही लोकशाहीला कलंकित करणारी बाब आहे. आता अशी चर्चा आहे की स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा विचार करता त्यांचा मंत्रिपदाचा राजीनामा घेतला जाणार नाही.

कोकाटेंकडुन कृषी खाते काढून ते मकरंद पाटील यांना दिले जाईल आणि पाटील यांच्या कडील मदत व पुनर्वसन खाते कोकाटेंना दिले जाईल, अशा चर्चेला उधान आले आहे. सभागृहात रमी सारखा जुगार खेळणारा मंत्री, शेतकऱ्यांचा अपमान करणारा व १४ कोटी जनतेला ठेच पोहचणारे कोकाटे यांच्यावर कायदेशीर कोणतीच कारवाई न करता सरकार अभय देत आहे ही राज्यासाठी, शेतकऱ्यांसाठी धक्कादायक बाब आहे. यावर सरकार व राज्यपालांनी गांभीर्याने विचार करावा व माणिकराव कोकाटेंवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी.



रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

■ ■ ■

# सणांचा, व्रत वैकल्याचा महिना श्रावण

काल शुक्रवारपासून श्रावण महिना सुरू झाला. हिंदू धर्मात श्रावण महिन्याचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. श्रावण महिन्यातील सोमवार हिंदू धर्मात पवित्र मानला जातो. या दिवशी महादेवाची पूजा केली जाते. तसे श्रावण महिन्यातील प्रत्येक वारी कोणत्या ना कोणत्या देवतेची पूजा व व्रत करण्याची हिंदू व जैन धर्माची परंपरा आहे.

श्रावण महिन्याला सणांचा महिना म्हंटले जाते. कारण श्रावण महिन्यातच सर्वात जास्त सण येतात. या महिन्यात व्रत वैकल्याची रेलचेल असते. श्रावण महिन्यात नाग पंचमी, रक्षा बंधन, नारळी पौर्णिमा, श्रीकृष्ण जन्माष्टमी, गोपाळकाला, मंगळागौर, बैल पोळा हे सण येतात. त्यानंतर येणारे गौरी गणपतीही याच महिन्यात खुणावत असतात. नाग पंचमी पासून दसरा दिवाळी पर्यंत सगळ्या हव्या हव्याशा सणांची सुरुवात याच महिन्यापासून होते.

श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

सणांच्या दिवशी गोडाधोडाचा बेत घराघरात असतो. श्रावणातील प्रत्येक दिवस सण होऊन जातो. अशा आनंदी वातावणामुळे असेल कदाचित पण श्रावणात मनाच्या सांदी कोपऱ्यात उत्साहाचे नवे ऋतू फुलत असतात. बहुतेक सगळ्या सणामध्ये आणि अंगिकारल्या जाणाऱ्या व्रत वैकल्यांमधून संकटातून निर्भिडपणे आणि यशस्वीपणे बाहेर येण्यासाठी शक्ती मिळवण्यासाठी प्रेरणा मिळते. श्रावण महिना केवळ हिंदुंसाठीच नव्हे तर मुस्लिम आणि पारशी बांधवांसाठी ही पवित्र महिना मानला जातो. याच महिन्यात मुस्लिमांची बकरी ईद आणि पारशी बांधवांची पतेती हे सण येतात. त्यामुळे हिंदू प्रमाणेच जैन, मुस्लिम आणि पारशी बांधव श्रावण महिन्याची आतुरतेने वाट पाहत असतात. मुस्लिम आणि पारशी बांधव देखील त्यांचे सण उत्साहात आणि जल्लोषात साजरे करतात.

आषाढ महिन्यात झालेला पावसाने सर्वत्र हिरवळ दाटलेली असते. निसर्ग आषाढ सरी पिऊन हिरवे गालिचे पसरून बहरलेला असतो. हा हिरवा गालिचा पाहूनच

*हिरवे हिरवेगार गालिचे*
*हरित तृणाच्या मखमालीवर....*

ही कविता बालकवींना सुचली असावी. श्रावण महिन्यात सगळीकडे वसुंधरेवर श्रावणाच्या धारा बरसत असतात. श्रावणाच्या धारा बरसत असल्याने निसर्ग सौंदर्य तृप्तीचा हुंकार देत असतो. निसर्गाचे बहरलेले सौंदर्य पाहताच हासरा, नाचरा, लाजरा, सुंदर साजिरा श्रावण आला या ओळी ओठी गुणगुणावश्या वाटतात.

श्रावण म्हणजे चैतन्य....
*श्रावण म्हणजे उत्साह.....*
*श्रावण मासी हर्ष मानसी*
*हिरवळ दाटे चोहिकडे*
*क्षणात येते सरसर शिरवे*
*क्षणात फिरून उन पडे*

या कवितेत बालकवींनी श्रावण महिन्याचे चित्रण यथार्थपणे मांडले आहे. ■ ■ ■

# विवाहबाह्य संबंधात तामिळनाडू अव्वल

जगभरातील डेटिंगवर लक्ष ठेवणारी संस्था ॲशले मॅडिसनने खुलासा केला आहे की विवाहबाह्य संबंधांच्या बाबतीत (म्हणजे लग्नानंतरही इतर संबंध ठेवण्याच्या बाबतीत) भारत जगात सहाव्या स्थानावर पोहोचला आहे. इतकेच नाही तर, तामिळनाडू आता दिल्ली आणि मुंबईला मागे टाकत यादीत अव्वल स्थानावर आहे. 'ॲशले मॅडिसन' या जागतिक डेटिंग प्लॅटफॉर्मने अलीकडेच विवाहबाह्य संबंधांवर एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यात असा दावा करण्यात आला आहे की भारतात विवाहबाह्य संबंधांचा आलेख वाढला आहे. आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे यामध्ये लहान शहरे महानगरांपेक्षा पुढे जात आहेत.




या अहवालानुसार, विवाहबाह्य संबंधांच्या बाबतीत तामिळनाडूतील कांचीपुरम शहर देशात पहिल्या क्रमांकावर आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की २०२४ मध्ये कांचीपुरम या यादीत १७ व्या क्रमांकावर होते, परंतु आता ते पहिल्या क्रमांकावर पोहोचले आहे.

ॲशले मॅडिसनने म्हटले की, ही रँकिंग केवळ नवीन वापरकर्त्यांच्या साइन-अपवर आधारित नाही तर त्यात वापरकर्त्यांच्या क्रियाकलाप, प्लॅटफॉर्मवर घालवलेला वेळ आणि प्रतिबद्धतेची पातळी देखील समाविष्ट आहे. हा सर्व डेटा शहरातील विवाहबाह्य संबंध दर्शवितो.

एप्रिलच्या सुरुवातीला, ॲशले मॅडिसनने ouGov च्या सर्वेक्षणाचे निकाल जाहीर केले होते ज्यामध्ये भारत आणि ब्राझील हे विवाहबाह्य संबंधांचे सर्वाधिक प्रमाण असलेले देश म्हणून स्थान देण्यात आले होते. त्या डेटामध्ये, भारतातील ५३% सहभागींनी कबूल केले की त्यांच्या आयुष्यात कधीतरी त्यांचे विवाहबाह्य संबंध होते.

अहवालात असा दावा करण्यात आला आहे की भारत हा व्यवहारांसाठी सहावा सर्वात मोठा जागतिक बाजार बनला आहे. टियर-२ शहरांमध्येही विवाहबाह्य संबंध वाढत आहेत. या तीव्र वाढीमागे प्लॅटफॉर्मने कोणतेही विशिष्ट कारण दिले नाही. परंतु अहवालात असे म्हटले आहे की भारतातील टॉप २० जिल्ह्यांपैकी ९ जिल्ह्यांचा समावेश दिल्ली-एनसीआर प्रदेशातील आहे. दिल्लीतील ६ जिल्हे (मध्य दिल्ली दुसऱ्या क्रमांकावर), गुडगाव, गाझियाबाद आणि गौतम बुद्ध नगर (नोएडा) यांचाही यादीत समावेश आहे.

यावेळी मुंबई यादीतून बाहेर पडली आहे, तर जयपूर, रायगड (छत्तीसगड), कामरूप (आसाम) आणि चंदीगड सारख्या शहरांनी नवीन स्थान मिळवले आहे. गाझियाबाद आणि जयपूर, जे टियर-२ शहरे मानले जातात, त्यांनी अनेक प्रमुख शहरी केंद्रांना मागे टाकले आहे.

■ ■ ■

# चाहूल श्रावण मासाची..!

*अनेक गुणधर्म असलेली दिसें*
*माळरानात बांधावर रानभाजी*
*भरपूर औषधी गुणधर्म त्यात*
*ते घेई... आरोग्याची काळजी*

श्रावण महिना हा सहसा पावसाळी भाज्या खाण्यासाठी प्रसिद्ध आहे. श्रावण महिन्यात चांगले आणि पौष्टिक अशा हिरव्या पालेभाज्या मिळतात. हिरव्या पालेभाज्यामुळे आरोग्याला फायदा मिळतो. त्यामुळे अशा भाज्यांचा आस्वाद अधिक घ्यावा.

सहसा या काळात मासाहार करण्यात येत नाही. श्रावण महिन्याचे महत्व हे धार्मिक पौराणिक आणि आरोग्यदृष्ट्या ही अधिक मानण्यात येते. प्रत्येक अश्या धर्मा नुसार श्रावण महिन्याचे खास वैशिष्ट्य आहे. श्रावण हा पावसाळा ऋतूमध्ये येणारा महिना आहे. निसर्गातही यावेळी अत्यंत उत्साह असतो. सणाचा राजा म्हणून श्रावण महिना ओळखण्यात येतो.

सौ. चैताली संगोपाल वरघट
मूर्तिजापूर, जि. अकोला.
9834593685

श्रावण महिना हा आल्हाददायक सगळ्यांना हवाहवासा वाटणारा ऋतू. श्रावणातील पावसाची विविध रूपे असतात आणि हेच श्रावणातील पावसाचे वैशिष्ट्य समजण्यात येते. श्रावण सुरू झाल्यावर पावसाची रिमझिम सुरू होते.

त्या आधी आषाळात धो धो कोसळणारा पाऊस जरा सौम्य होतो. लहान मुलांना हा पाऊस अधिक आवडतो. तर कधी अचानक पाऊस वाऱ्यासह अधून मधून येत असतो. जो प्रेमळ, मनमोहक हवाहवासा वाटतो. याशिवाय कधीतरी मुसळधार पाऊसही पडतो. तर क्षणात ऊन आणि क्षणात पाऊस हे देखील श्रावणातील पावसाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. अशा या पावसामुळे निसर्गातही अनेक बदल होतात आणि संपूर्ण सृष्टी हिरवीगार दिसू लागते.

मात्र श्रावणातील पाऊस हा सहसा निसर्गाला हानी पोहोचवेल असा कधीही बरसत नाही. पावसाळा सुरू झाला की अनेक जण विशेषतः महिला या श्रावण महिन्याची आतुरतेने वाट पाहत असतात. मराठी श्रावण महिना म्हटलं की सर्व सणांचा राजा मानला जातो. श्रावण महिन्याचे महत्त्व आपल्याकडे अधिक आहे.

श्रावण महिना हा कोणत्या ऋतूत येतो हे वेगळे सांगायची गरज नाही. पावसाळा ऋतूमध्ये येणारे श्रावण सण प्रत्येकाला हवेसे वाटतात. श्रावण महिन्यात अनेक सण असतात. श्रावण महिन्यातील सण मात्र या संपूर्ण महिन्यात अगदी हौशीने साजरे केले जातात. निसर्ग तसेच परंपरा या दोन्ही सृष्टीने श्रावण महिन्याचे महत्त्व आहे.

चतुर्मासातील सर्वात श्रेष्ठ महिना म्हणून श्रावण महिन्याची ओळख आहे. आषाढी अमावस्येला दिव्याची आरास केल्यानंतर सर्व व्रतवैकल्यांना सुरुवात करण्यात येते. यानंतर निसर्गातील वातावरण ही बदलते आणि ऊन पावसाचा खेळ श्रावणामध्ये सुरू होतो.

रसरशीत हिरव्या भाज्यांचा हा महिना सुरू होतो. श्रावण महिना हा उत्सवाचा महिना म्हणून ओळखला जातो. आणि म्हणूनच याला सणांचा राजा श्रावण असे म्हणतात. कारण बरेच मराठी सण या महिन्यात असतात. विशेषता महिलांसाठी हा महिना खास असून विवाहांसाठी तर माहेरी जाण्याची पूर्ण पर्वणीच असते.

श्रावण महिना म्हटलं की डोळ्यासमोर येतात ते अत्यंत निर्मळ असं वातावरण आणि नजरेस पडते ती सर्व हिरवीगार सृष्टी. श्रावण महिन्यात बरेचं सण उत्सव साजरे केले जातात. जसे की नागपंचमी, मंगळागौरी, श्रावण सोमवार, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, कृष्ण जन्माष्टमी, दही काला, पिठोरी अमावस्या, शेतकरांचा सण पोळा इत्यादी सण उत्सव साजरे केले जातात. तसेच बौद्ध धर्मी[यांच्यासाठी श्रावण महिना वषावास उपासना या दृष्टीने अधिक महत्वाचा मानला जातो.

*आता येणार श्रावण*
*चाहूल झाली श्रावणाची*
*व्रत उपासनेचा महिना*
*सांगे सृष्टीची कहाणी*

■ ■ ■

# या टिप्स वापरुन बनवा कारले कडूही लागणार नाही मुलंही खातील



बहुतेक लोकांना कारला आवडत नाही ही एक सामान्य गोष्ट आहे. याचे मुख्य कारण म्हणजे त्याची कडूपणा. पण, कारले आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. कारल्याचे सूप बनवण्यापूर्वी, महिलांना अनेकदा प्रश्न पडतो की, मुले ही भाजी खातील की नाही. जर तुम्हालाही या समस्येचा त्रास होत असेल तर काळजी करू नका. कारण आता तुम्ही सोप्या पद्धतीने कारल्याचा कडूपणा दूर करू शकता.

कारल्याचा कडूपणा दूर करण्यासाठी तुम्ही मीठ, दही, लिंबू आणि चिंच वापरू शकता, जो एक अतिशय सोपा आणि जुना घरगुती उपाय आहे. यामुळे कारल्याची चव दुप्पट होते.

कारल्याच्या स्वयंपाकात 'मीठ' जास्त प्रभावी मानले जाते. सर्वप्रथम, तुम्हाला कारल्याचे तुकडे करावे लागतील. त्यानंतर त्यात थोडे मीठ घालून १५ ते २० मिनिटे तसेच राहू द्या. यामुळे कारल्याचा कडू रस पूर्णपणे निघून जाईल. नंतर कारल्याला पाण्याने चांगले धुवा. असं केल्यास कारले कडू लागणार नाही.

सर्वप्रथम, एका भांड्यात दही घ्या, आता कारल्याचे तुकडे करा आणि ते भांड्यात ठेवा. सुमारे अर्ध्या तासानंतर, हे कापलेले कारले दह्यातून काढून स्वच्छ पाण्याने धुवा. ज्यामुळे भाजी मऊ आणि खायला चविष्ट होईल.

कारल्याचा कडूपणा कमी करण्यासाठी तुम्ही चिंचेची पेस्ट वापरू शकता. कारल्याला चिंचेच्या पाण्यात सुमारे २० ते २५ मिनिटे ठेवल्यानंतर, स्वच्छ पाण्याने धुवा. या टिप्स फॉलो करून तुम्ही स्वादिष्ट कारल्याचा सूप बनवू शकता.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### ॥ जय गजानन ॥

गजाननाच्या पद स्पर्शाने
गजबजली मेहकर नगरी
आबालवृद्धभक्त नरनारी
दर्शना आतूर झाले भारी..

सत्संगाने होई आत्मोद्धार
वृत्ती असावी परोपकारी
त्याचा पाठीराखा गजानन
विश्वास ठेवा या वचनावरी.

उष्ट्या पत्रावळीतील
शितांचे करून भक्षण
अन्नाचा करा सन्मान
शिकवण देती संत गजानन.

# ठेकेदाराच्या प्रेमापोटी कचरा गाडी केली भंगार!

## गावकऱ्यांचा संताप; ग्रामपंचायतीच्या निर्णयावर उठले अनेक प्रश्न



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, (दि.25)** – गावातील स्वच्छतेसाठी नेमलेली एकमेव कचरा गाडी ठेकेदाराच्या खाजगी वापरासाठी ङ्क गिट्टी व रेती वाहतुकीसाठी वापरण्यात आल्यामुळे ती सद्यस्थितीत भंगारात रूपांतरित झाली आहे. या प्रकारामुळे ग्रामपंचायतीच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून गावकऱ्यांमध्ये संताप उसळला आहे.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत गावासाठी उपलब्ध झालेली गाडी नियमितपणे घराघरातील कचरा गोळा करण्यासाठी वापरण्यात येत होती. मात्र, काही महिन्यांपासून गाडी थेट ठेकेदाराच्या बांधकाम कामासाठी वापरली जात असल्याचे समोर आले आहे. गिट्टी, रेती व बांधकाम साहित्याच्या वाहतुकीत वापरामुळे गाडीचे वारंवार बिघाड होणे, दुरुस्तीसाठी लांबलेली विलंबाची कामगिरी आणि गावातील अस्वच्छतेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनला होता. स्थानिक ग्रामस्थांच्या सततच्या तक्रारींनंतर माजी आमदारांच्या पुढाकारातून नवीन कचरा गाडी मिळवण्यात यश आले. मात्र, त्यानंतरही जुनी गाडी पुन्हा ठेकेदाराच्या वापरात दिल्याचे समजल्याने ग्रामपंचायतीच्या भूमिकेवर नाराजीचा सूर उठत आहे. या प्रकाराची स्वतंत्र चौकशी होणे अत्यावश्यक आहे. संबंधित ग्रामसेवक, सरपंच व प्रशासकीय अधिकारी यांनी याकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास गावकऱ्यांच्या हक्कांचे नुकसान होणार हे निश्चित आहे. गावासाठी असलेली सुविधा, खासगी फायद्यासाठी वापरणं ही गंभीर अनियमितता असून, याला जबाबदार व्यक्तींवर कारवाई झाली पाहिजे, अशी जोरदार मागणी आता होत आहे.

> गावासाठी असलेली गाडी ठेकेदारासाठी वापरली जाते हे लाजिरवाणं आहे. ग्रामपंचायत इतकी कृपावान का झाली?
>
> **पवन ठाकरे, गावकरी.**

> गाडी वापरल्याबदल्यात काही भाडं ग्राम पंचायतीच्या खात्यात जमा होतंय का? चौकशी होणं गरजेचं आहे.
>
> **उमेश कळमेघ, गावकरी.**

# दारापुर येथे साकारले जाणार माजी राज्यपाल दादासाहेब गवई स्मृती प्रवेशद्वार

## देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते भूमिपूजन सोहळा



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.25)** – सामाजिक समतेचे प्रणेते, अजातशत्रू आणि सर्वसमावेशक नेतृत्व लाभलेल्या माजी राज्यपाल स्मृतीशेष रा.सु. उपाख्य दादासाहेब गवई यांच्या जन्मगाव दारापुर येथे त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ भव्य स्मृती प्रवेशद्वार उभारण्यात येणार आहे. आज त्यांच्या 10व्या पुण्यस्मरण दिनी, देशाचे सरन्यायाधीश भूषण रामकृष्ण गवई यांच्या हस्ते या प्रवेशद्वाराच्या स्थळाचे भूमिपूजन पार पडले.

या प्रसंगी आ. सुलभा खोडके, आ. संजय खोडके, रिपाईचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजेंद्र गवई, तसेच दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टचे पदाधिकारी, गावकरी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भूषण गवई यांचे आगमन होताच आमदार सुलभा खोडके आणि आमदार संजय खोडके यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर सरन्यायाधीश भूषणजी गवई यांनी कुदळ मारून भूमिपूजन व नामफलकाचे अनावरण करून या ऐतिहासिक स्मृतीद्वाराच्या कामाची औपचारिक सुरुवात केली. दादासाहेब गवई हे विधानपरिषद सदस्य, उपसभापती, खासदार, केंद्रीय मंत्री आणि बिहार राज्याचे राज्यपाल अशा विविध पदांवर कार्यरत राहिले. त्यांनी समाजातील उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी अखंड कार्य केले. राजकारणात अजातशत्रू असलेले दादासाहेब गवई यांचे सर्व पक्षीय नेत्यांशी सौहार्दपूर्ण संबंध होते, असे गौरवोद्गार आमदार संजय खोडके यांनी काढले.

दादासाहेबांचे जीवनकार्य प्रेरणादायी असून त्यांच्या स्मृतीचे जतन करणे हे नव्या पिढीचे कर्तव्य आहे. दारापुर येथे उभा राहणारा स्मृती प्रवेशद्वार हा त्यांच्या झंझावाती कार्याचा दिपस्तंभ ठरेल, असे मत आमदार सुलभा खोडके यांनी व्यक्त केले. या प्रसंगी कीर्ती अर्जुन (गवई), प्रा. डॉ. कमलाकर पायस, प्राचार्य डॉ. डी.टी. इंगोले, तसेच ट्रस्टचे इतर पदाधिकारी आणि ग्रामस्थांनीही स्मृतिद्वाराबाबत आनंद व्यक्त केला. हा स्मारकप्रकल्प दादासाहेबांच्या योगदानाचे प्रतीक ठरून अनेकांना प्रेरणा देणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## सासरा, साळ्याची जावयाला मारहाण

**अमरावती** – सासरा व साळ्याने जावयाला मारहाण केली. ही घटना दर्यापूर ठाण्याच्या हद्दीत 24 जुलै रोजी सायंकाळी घडली. चांदूर रेल्वे तालुक्यातील सातेफळ येथील रहिवासी सतीश मारोतराव खडसे (33) हे न्यायालयात तारीख असल्याने दर्यापूरला आले होते. त्यावेळी सासरे राजू डहाके व साळा शैलेंद्र डहाके यांनी त्यांना काठीने मारहाण केली.

# अल्पवयीन मुलीच्या आत्महत्येप्रकरणी तरुणाला अटक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 25)** – गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीने राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना 24 जुलै रोजी दुपारी उघडकीस आली होती. या प्रकरणी मृत मुलीच्या आईच्या तक्रारीवरून रात्री एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली. अभिषेक उर्फ गोलू जनार्धन पवार (24, रा. रमाबाई आंबेडकरनगर, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे.

गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीतील रहिवासी एका 15 वर्षीय मुलीने राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली. ती इयत्ता दहाव्या वर्गात शिकत होती. याबाबत माहिती मिळाल्यावर गाडगेनगर पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला व मृतदेहाला शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आले. दरम्यान, सायंकाळी मृत मुलीच्या नातेवाइकांनी गाडगेनगर ठाण्यावर धडक देत आक्रोश केला. अभिषेक पवार हा गत काही दिवसांपासून मुलीचा पाठलाग करून तिच्यासोबत जबरदस्तीने बोलण्याचा प्रयत्न करीत होता. तो तिला मानसिक त्रास देत होता. त्याच्या त्रासामुळेच मुलीने गळफास लावून आत्महत्या केली. मुलीच्या आत्महत्येला अभिषेक पवार हाच जबाबदार असल्याचा आरोप यावेळी नातेवाइकांनी केला होता.या प्रकरणी मृत मुलीच्या आईच्या तक्रारीवरून पोलिसांनी अभिषेक पवारविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त करणे, ॲट्रॉसिटी व बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करून त्याला तातडीने अटक केली. त्याला 25 जुलै रोजी न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.

**मृताच्या आईची तक्रार**

# ग्रामपंचायतीत सरपंच पतींचा हस्तक्षेप






**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,(दि.25)** –अमरावती जिल्ह्यातील चांदूर बाजार तालुक्यातील ब्राह्मणवाडा थडी येथील ग्रामपंचायतीत सुरु असलेल्या अंतर्गत संघर्षाने आता उघड रूप घेतले आहे. ग्रामपंचायत सदस्य रविंद्र उल्हे यांनी सरपंच प्रज्ञा संजय म्हस्कर यांच्याविरोधात गंभीर स्वरूपाची तक्रार विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषद मुख्याधिकारी यांच्याकडे दाखल केली आहे.

तक्रारीमध्ये उल्हे यांनी म्हटले आहे की, सरपंच यांचे पती ग्रामपंचायतीच्या प्रत्येक कामात सर्रास हस्तक्षेप करतात. ग्रामसभा किंवा मासिक सभांमध्ये झालेल्या ठरावांची अंमलबजावणी केली जात नाही. 15व्या वित्त आयोगातून मंजूर निधीतून धर्मशाळा व महिला सभागृहाचे काम अद्यापही सुरू झालेले नाही. तसेच, व्हिडिओ शूटिंगच्या बिलांवर सरपंचांनी सही नाकारल्यामुळे कामकाज अडथळले आहे.

तसेच उल्हे यांनी आरोप केला की, सदस्यांनी ग्रामपंचायतीच्या जमाखर्चाविषयी विचारणा केली असता सरपंचांनी उर्मट आणि असोब्य वर्तन केले. ग्रामपंचायतीचे अनेक नमुने अद्यावत नाहीत, तसेच अपूर्ण कामांचे हस्तांतरण ग्रामपंचायतीला विश्वासात न घेता करण्यात आले. याशिवाय, सरपंच यांनी खोटे दाखले वितरित केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

उल्हे यांच्या म्हणण्यानुसार, सरपंचांचे नातेवाईक चिंचोली येथील सरकारी जागेवर अतिक्रमण करून राहत आहेत, आणि त्यांच्याकडे मालकीचे कोणतेही पुरावे नसतानाही संबंधित प्रकरण जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रलंबित आहे. तसेच, दक्षता समिती अंतर्गत रेशन दुकानाबाबत 2023 साली एकही सभा घेतली गेली नाही, असेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

रविंद्र उल्हे यांनी या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून तत्काळ कारवाईची मागणी केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, सरपंच आणि त्यांचे पती मनमानी कारभार करत असून, मला न्याय मिळेल अशी अपेक्षा आहे. दरम्यान, सरपंच प्रज्ञा म्हस्कर यांनी सर्व आरोप फेटाळून लावत म्हटले की, माझे पती ग्रामपंचायतीच्या कोणत्याही कामात हस्तक्षेप करत नाहीत. खर्चावर सचिव व सरपंच यांच्या सह्या असतात, तसेच ठरावांची अंमलबजावणी होत आहे. काम सुरु आहे, तर खर्च होणारच. या तक्रारीमुळे ब्राह्मणवाडा थडी ग्रामपंचायतीतील प्रशासनात पारदर्शकतेचा प्रश्न उभा राहिला आहे, आणि आता विभागीय आयुक्तांकडून चौकशी होणे अपरिहार्य ठरणार आहे.

**सदस्यांची विभागीय आयुक्तांकडे तक्रार**

**ब्राह्मणवाडा थडी प्रकरणात चौकशीची मागणी**



# आज कारगिल विजय दिन : अमरावती जिल्ह्यात वीर जवानांना सलाम!

## शौर्य, बलिदान आणि विजयाचा गौरव

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.25)** – भारतातील सैन्याच्या पराक्रमाचे स्मारक ठरलेल्या कारगिल विजय दिनाचे आज देशभरात औचित्याने आयोजन करण्यात आले असून, वीर जवानांच्या बलिदानास आणि पराक्रमास सलाम करण्यात आला. 1999 साली कारगिल युद्धात भारतीय सैन्याने दाखवलेल्या धैर्यपूर्ण कामगिरीच्या स्मरणार्थ हा दिवस दरवर्षी 26 जुलै रोजी साजरा केला जातो.

या युद्धात भारताने सुमारे 60 दिवसांच्या संघर्षानंतर निर्णायक विजय मिळवला होता. या ऐतिहासिक लढ्यात अमरावती जिल्ह्यातील 20 ते 25 पेक्षा अधिक जवान सहभागी होते, ही जिल्ह्यासाठी विशेष अभिमानाची बाब आहे. यामध्ये एअर फोर्समधील जवानांनीही लक्षणीय कामगिरी बजावली होती, अशी माहिती फ्लाईट सार्जंट दिनेश देशमुख यांनी दिली. पाकिस्तानी सैन्याने जम्मू-काश्मीरमधील कारगिल पर्वतरांगांमध्ये बेकायदेशीर घुसखोरी केल्यानंतर, भारतीय सैन्याने त्यांना परत पाठवण्यासाठी मोहीम हाती घेतली. अवघड भौगोलिक परिस्थितीतही भारतीय जवानांनी अभूतपूर्व शौर्य दाखवत पाकिस्तानचा पराभव करून कारगिलमधील सर्व तळ पुन्हा हस्तगत केले.

### एक प्रेरणादायी दिवस

आजचा दिवस भारताच्या सैनिकी इतिहासातील तेजस्वी क्षणांचे प्रतीक आहे. शहीद जवान अमर रहें! या घोषणांनी संपूर्ण देश दुमदुमत आहे. प्रत्येक भारतीयाने शहीदांच्या स्मृतीला अभिवादन करून त्यांच्या बलिदानाचे स्मरण करणे हीच खरी आदरांजली ठरेल.

कारगिल विजय दिनानिमित्त अमरावती जिल्ह्यात विविध शैक्षणिक व सामाजिक संस्थांमध्ये श्रद्धांजली सभा, रक्तदान शिबिर, देशभक्तिपर सांस्कृतिक कार्यक्रम यांचे आयोजन करण्यात आले. अमरावती येथील शासकीय मुलींच्या आयटीआयमध्ये शुक्रवारी (दि. 25 जुलै) कारगिल विजय दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि दोन मिनिटांच्या मौनाने झाली.यानंतर फ्लाईट सार्जंट दिनेश देशमुख यांनी विद्यार्थ्यांना युद्धातील प्रसंग कथन करून प्रेरणादायी मार्गदर्शन केले. तसेच हवालदार अनिल निर्मळ यांनी प्रत्यक्ष कारगिल युद्धातील अनुभव सांगत शौर्यगाथा उलगडली. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचे दादासाहेब गवई यांना अभिवादन



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.25)**– सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी आज दारापूर येथे त्यांच्या वडील स्व. रा.सु. (दादासाहेब) गवई यांच्या स्मृतिदिनानिमित्त स्मृतीस्थळी पुष्प अर्पण करून भावपूर्ण अभिवादन केले. डॉ. दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित कार्यक्रमात खासदार बळवंत वानखडे, न्या. भूषण गवई यांच्या मातोश्री कमल गवई, ट्रस्टच्या अध्यक्षा कीर्ती गवई अर्जून, तेजस्विनी गवई, सदस्य डॉ. राजेंद्र गवई, तक्षशिला अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. टी. इंगोले, धरम गवई यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी दारापुर फाटा येथे उभारण्यात येणाऱ्या गावाच्या प्रवेशद्वाराचे, श्री दादासाहेब गवई स्मृतिद्वार म्हणून नामकरण करण्यात आले असून, या प्रवेशद्वाराच्या बांधकामाचे भूमिपूजन सरन्यायाधीश न्या. भूषण गवई यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर तक्षशिला अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या परिसरातील स्मृतीस्थळावर सरन्यायाधीश गवई यांनी अभिवादन केले. महाविद्यालयातील इनडोअर स्टेडियममध्ये दादासाहेब गवई यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून सामूहिक बुद्धवंदना करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन सचिव डॉ. कमलाकर पायस यांनी तर आभार प्रदर्शन अधीक्षक सचिन पंडित यांनी केले. कार्यक्रमास सामाजिक, शैक्षणिक व कायदाक्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.

# खोपडा शेतशिवारात अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,(दि.25)** – मोर्शी तालुक्यातील खोपडा शेतशिवारात दिनांक 23 जुलै रोजी तब्बल 3 तास सतत झालेल्या मुसळधार पावसामुळे ढगफुटी सदृश स्थिती निर्माण झाली. परिणामी संपूर्ण शेती पाण्याखाली गेली असून, शेतजमिनीत तलावासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे पेरलेली पिके वाहून गेली असून शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे.

या अचानक झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी हवालदिल झाले असून, त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. अनेक शेतकऱ्यांचे कर्जाचे हप्ते भरायचे आहेत, पिकांच्या अपेक्षेवर जगणारे हे शेतकरी आता नुकसानभरपाईच्या प्रतीक्षेत आहेत. या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी तहसीलदार विनोद वानखडे यांना निवेदन देऊन तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी केली. निवेदन देताना मोर्शी तालुका खरेदी-विक्री संघाचे संचालक नरेंद्र रामटेके, मोर्शी शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष भुषण कोकाटे, राजेंद्र लाखोडे, तसेच नुकसानग्रस्त शेतकरी पवन पारिसे व सरस्वतीबाई पारिसे उपस्थित होते. शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, हवामान विभागाकडून इशारा मिळूनही योग्य उपाययोजना करण्यात आल्या नाहीत. त्यामुळे पंचनामे करून त्वरित मदत जाहीर केली जावी, जेणेकरून शेतकरी किमान आपली आर्थिक परिस्थिती सावरण्याचा प्रयत्न करू शकतील. या नैसर्गिक संकटाने पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या अडचणींवर प्रकाश टाकला असून, शासनाकडून तातडीने मदतीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# टपाल ऑफिसच्या नुतनीकरणासाठी गावकरी सरसावले



**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड, (दि.25)** – दैनिक महासागरच्या ने 9 जुलैच्या अंकात टपाल ऑफिस झाले 'टपक' ऑफिस! या शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेल्या बातमीचा सकारात्मक परिणाम दिसून येत आहे. हिवरखेड येथील पोस्ट ऑफिसच्या जिर्णावस्थेकडे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले असून, गावकरी आणि सामाजिक कार्यकर्ते कार्यालयाच्या नुतनीकरणासाठी पुढे सरसावले आहेत.

हिवरखेड येथील टपाल कार्यालय हे परिसरातील अत्यंत महत्त्वाचे केंद्र असून दररोज सुमारे दोन लाखांहून अधिक रुपयांचे आर्थिक व्यवहार येथे पार पडतात. सुमारे पाच हजार खातेदार या पोस्ट ऑफिसशी जोडलेले असून बँकिंग सेवा, पत्रव्यवहार, बचत योजना आणि इतर महत्त्वाचे व्यवहार येथे पार पडतात. मात्र, सध्या कार्यालयात छतावरील गळतीमुळे पावसाचे पाणी झिरपत होते, ज्यामुळे कार्यालयातील कागदपत्रे, रेकॉर्ड्स आणि पार्सल्सना धोका निर्माण झाला होता. यामुळे कर्मचाऱ्यांचे कामकाज आणि नागरिकांचे व्यवहार दोन्ही अडथळले जात होते. या समस्येबाबत ग्रामस्थांनी एकत्र येत कार्यालयाच्या नुतनीकरणासाठी देणगी जमा करत कार्यालयाच्या नुतनीकरणाला सुरवात केली आहे. याकरिता हिवरखेडचे सामाजिक कार्यकर्ते निलेश संपतराव शिरभाते, विनायकराव खांडेकर, भाजप कार्यकर्ते मनोज मोकलकर, गोपालराव मालपे, तसेच चरणदास बारस्कर यांनी यासाठी पुढाकार घेतला आहे.

# लसनापूर येथे महिलेला मारहाण

**अमरावती**– आसेगाव पूर्णा ठाण्याच्या हद्दीतील लसनापूर येथे एका महिलेला मारहाण करण्यात आली. ही घटना 22 जुलै रोजी सायंकाळी घडली. लसनापूर येथील रहिवासी मंगेश पैठणकर (30) याने लाकडी भुसा व कचरा शेजारी राहणाऱ्या एका महिलेच्या घराच्या बाजूला लावला. त्यामुळे महिलेने त्याला हटकले. त्यावर मंगेशसह प्रवीण पैठणकर (32) व सुधाकर पैठणकर (65) यांनी महिलेच्या घरी जावून त्यांच्या आईला मारहाण केली. तसेच महिला, त्यांची आई व भावाला शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी महिलेने आसेगाव पूर्णा ठाण्यात तक्रार दाखल केली.

# गावखेड्यातही ऑनलाइन जुगाराचं फॅड

## ग्रामीण जीवनात नवा घातक कल



**नितिन दुर्बडे**

**पथ्रोट,(दि.25)**– कधीकाळी सकाळच्या वेळी घराघरातून ऐकू येणारी काकड आरती, भजन, कीर्तनांची गूंज आज केवळ आठवणींमध्ये शिल्लक राहिली आहे. ग्रामीण महाराष्ट्रात मोबाईलचा वाढता प्रभाव आणि त्यातून फोफावलेला ऑनलाइन जुगाराचा विळखा हे नव्या संकटाचे कारण ठरत आहे.

एकेकाळी सामाजिक व सांस्कृतिक एकोपा असलेली गावं आज तुटक झाली आहेत. माणसांमध्ये संवाद संपला असून, मोबाईलच्या स्क्रीनमध्ये हरवलेली माणसं आता ऑनलाइन सट्टा, कॅसिनो, बेटिंग ॲप्स यांसारख्या जुगार खेळांकडे वळली आहेत. या विळख्यात शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, शेतकरी, मजूर वर्ग या सर्वच घटकांचा समावेश आहे.

गावखेड्यातील तरुण दिवसभर काहीच उत्पादनशील कार्य न करता मोबाईलवर गेमिंग ॲप्स, ऑनलाईन कॅसिनो यावर लाखो रुपयांचे व्यवहार करत आहेत. लक्ष लावून 'बिग विन' मिळवण्याच्या हव्यासात आयुष्याची खेळी गमावत आहेत. परिणामी, अनेक कुटुंबं आर्थिक अडचणीत सापडत असून, काही ठिकाणी आत्महत्येचे प्रकारही समोर येत आहेत.

या प्रकारांवर पोलीस यंत्रणेसाठीही नियंत्रण ठेवणे कठीण झाले आहे. ऑनलाइन जुगार ॲप्स परदेशातून चालवले जात असल्याने त्यांच्यावर कारवाई करणे तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक बनले आहे. या पार्श्वभूमीवर, या जुगार ॲप्सची जाहिरात करणाऱ्या खेळाडू आणि सेलिब्रिटींच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे. प्रसिद्धी आणि पैसे मिळवण्यासाठी अनेक नामांकित चेहरे या ॲप्सची जाहिरात करत असून, त्याचा थेट परिणाम तरुणाईवर होत आहे. जे मोठे खेळाडू, कलाकार जाहिरात करत आहेत, तेच आमच्यासाठी आदर्श आहेत, अशी भावना तरुणांमध्ये दिसून येत आहे. सरकार, पोलिस यंत्रणा, समाज आणि पालक यांनी एकत्र येऊन या ऑनलाईन जुगारविरोधात जनजागृती, कायदेशीर पावले, आणि तरुणांसाठी सकारात्मक पर्याय उभे करणं ही काळाची गरज बनली आहे. अन्यथा, ही कीड ग्रामीण संस्कृतीच्या मुळावर उठेल, हे निश्चित.


## जाहीर नोटीस

**अर्ज क्र. ०१७/कलम ३६ (१) (अ)/२०२५**

श्री महारूद्र संस्थान दहीगांव बुं.ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती

वरील अर्जदाराने वरील नमूद न्यासाची नोंदणी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अमरावती येथे केलेली आहे. तरी मौजे दहीगांव खुर्द ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती गट क्र. ७७ जुना सर्वे नं. २६/१ एकूण क्षेत्रफळ १ हेक्टर ४८ आर पैकी ०.५ आर पोट खराब रूपये ६.८८ सदर न्यासाने ही जमीन विक्रीस काढलेली आहे. त्याची चर्तु:सिमा पुढिलप्रमाणे :-

१) पूर्वेस :- श्री. सचिन डांगे यांचे शेत

२) पश्चिमेस :- मधुकर वाघमारे यांचे शेत

३) उत्तरेस :- श्री. रूपराव हिरे यांचे शेत

४) दक्षिणेस – श्री जानराव हिरे यांचे शेत

त्या अर्थी या नोटीस द्वारे कळविण्यात येते की, जर सदहू मालमत्तेवरील विक्री बाबत कोणालाही काही आक्षेप असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत मा. धर्मादाय सह आयुक्त अमरावती यांचे कार्यालयात जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधी मार्फत किंवा योगय रितीने सुचना दिलेल्या वकीलामार्फत खालील सही करणार यांचे समोर दिलेल्या पत्यावर दाखल करावे त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक १६/०४/२०२५ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी व धर्मादाय सही आयुक्तांच्या शिक्कयानिशी ही नोटीस दिली.

कोर्ट शिक्का

**(वि.सु. चव्हाण)**
**अधिक्षक (न्यास)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती**



# बालांगण

## पावभाजीची रंजक गोष्ट



**वाचा तर खरं**

**पंकजा देव**

मित्रांनो, रस्त्याच्या कोपऱ्यांपासून एखाद्या फॅन्सी रेस्टॉरंट्सपर्यंत सगळीकडे पावभाजीचा सुगंध तुमचे लक्ष वेधून घेतो ना? असे असताना तुम्हाला सांगितले गेले की, पावभाजीचा संबंध महाराष्ट्राशी नसून अमेरिकेशी आहे तर विश्वास बसेल का?

पण हे खरं तर. तुमच्या या आवडत्या स्ट्रीट फूडच्या कथेत अमेरिकन यादवी युद्धाचा एक मनोरंजक ट्विस्ट लपलेला आहे. पावभाजीचा जन्म आपल्या मुंबईत झाला असला तरी १८६० च्या अमेरिकन यादवी युद्धाने तिची लोकप्रियता आणि गरज वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात अमेरिकेत यादवी युद्ध सुरु असताना कापसाच्या जागतिक पुरवठ्यावर वाईट परिणाम झाला होता. अशा परिस्थितीत ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारतातील कापसाच्या गिरण्यांना कापसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढवण्याचे आदेश दिले. स्वाभाविकच मुंबईतील गिरणी कामगारांना कापसाची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी रात्रंदिवस काम करावे लागत होते. त्यांच्या कामाच्या शिफ्ट लांबत होत्या आणि जेवायलाही जास्त वेळ नव्हता. अशावेळी त्यांना लवकर मिळणाऱ्या, पोटभर आणि स्वस्त जेवणाची गरज होती. जेवल्यानंतर लगेचच शारीरिक श्रम करावे लागत असल्यामुळे अन्न हलके असणेही गरजेचे होते. मुंबईच्या रस्त्यावरील हुशार विक्रेत्यांना ही गरज समजली आणि त्यांनी उरलेल्या भाज्या एकत्र करुन, त्यात काही मसाले घातले आणि ब्रेड रोलवर पसरवून सर्व्ह करायला सुरुवात केली. त्या काळात कामगारांसाठी ते एक फास्ट फूड होते. म्हणजेच सुरुवातीला पावभाजी फक्त गिरणी कामगारांचे जेवण होती, परंतु हळूहळू तिची लोकप्रियता वाढत गेली. अनेकांनी पावभाजी हा एक सोपा आणि चविष्ट पर्याय म्हणून स्वीकारला. काही काळातच पावभाजी मुंबईच्या कानाकोपऱ्यात पसरली. करण्यास सोपी, उत्तम चव आणि कमी किमतीमुळे सर्व वर्गातील लोकांमध्ये तिची प्रसिद्ध वाढली.

## 'ओके'चा इतिहास



**टेक्नो टिप्स**

**उर्मिला राजोपाध्ये**

छोट्या दोस्तांनो, आपण सगळेच एखाद्या गोष्टीला सहमती देताना 'ओके' हा शब्द वारंवार आणि अगदी सहजतेने वापरतो. किंबहुना, जगभरात सर्वांना समजणारा हा शब्द आहे. पण याची सुरुवात एका विनोदाने झाली, हे तुम्हाला माहिती आहे का? ओके या शब्दाची उत्पत्ती समजून घेण्यासाठी आपल्याला १८३९ मध्ये जावे लागेल. तेव्हा अमेरिकन वर्तमानपत्रांमध्ये एक विचित्र ट्रेंड चालत असे. तो म्हणजे जाणूनबुजून चुकीचे स्पेलिंग वापरणे. तर तेव्हा ओके 'ऑल करेक्ट' असे लिहिले जायचे जो 'ऑल करेक्ट' चा जाणीवपूर्वक चुकीचा लिहिलेला प्रकार होता. १९ व्या शतकात अमेरिकन वर्तमानपत्रांमध्ये या प्रकारची भाषाशैली प्रचलित होती. विनोदी लेखांमध्ये, 'ऑल करेक्ट' हे 'आल करेक्ट' असे लिहिले जात असे आणि तेच पुढे 'ओके' झाले. त्या काळात वर्तमानपत्रांमध्ये जागेची कमतरता नसली तरीही संक्षेपांचा वापर करण्याची एक फॅशन बनली होती.

अर्थात १८४० ची अमेरिकन अध्यक्षीय निवडणूक झाली नसती तर ओके हा शब्द कदाचित विसरला गेला असता. पण तो जिवंत राहिला कारण या निवडणुकीत उमेदवार मार्टिन व्हॅन ब्यूरन यांना त्यांच्या मूळ ओल्ड किंडरहूक या गावावरुन 'किंडरहूक' हे टोपणनाव मिळाले.

मग समर्थकांनी त्यांच्या क्लबचे नाव 'ओके क्लब' ठेवले आणि त्याचे घोषवाक्य बनले, 'आम्ही ओके आहोत!'. आणि तेव्हापासून ओके या शब्दाला राजकीय लोकप्रियता मिळाली. लोक त्याचा अर्थ ओल्ड किंडरहूक असा मानू लागले.

ओकेच्या अर्थ आणि उत्पत्तीबद्दल नंतर अनेक भाषा सिद्धांतही समोर आले. काही लोकांनी त्याचा संबंध चोक्टॉ जमातीच्या ओके या शब्दाशी जोडले. तथापि, भाषाशास्त्रज्ञांनी नंतर सिद्ध केले की ओके हे प्रत्यक्षात 'ऑल करेक्ट' चेच संक्षिप्त रूप आहे आणि त्याची मुळे वर्तमानपत्रांमधील विनोदी लेखांशी संबंधित आहेत. तेव्हा आता ओके म्हणताना ही गंमत लक्षात ठेवा.



## आदर दाखवण्याचा योग्य उपाय

**एटिकेट्स**

**आरती देशपांडे**

तुम्ही अनेक लोकांना 'लेडीज फर्स्ट' म्हणताना ऐकले असेल. तुमच्यातील काही मुलगेही हा नियम पाळत असतील. याचा अर्थ महिला वा मुलींना आधी जागा देणे, असा असतो. पार्ट्यांमध्ये पुरुष पुढे जातो आणि बायकांसाठी दार उघडतो. काही जण त्यांच्यासाठी खुर्ची ओढतात तर काही जण सार्वजनिक ठिकाणी रांगेत उभ्या असणाऱ्या महिलांना पुढे येण्यास सांगतात. हे एक चांगले वर्तन समजले जाते. मात्र लेडीज फर्स्ट म्हणण्याचा ट्रेंड कुठून सुरू झाला? हे अनेकांना माहिती नसते.

छोट्या मित्रांनो, ही परंपरा युरोपपासून सुरू झाली. त्यावेळी तेथील श्रीमंत लोक महिलांचा आदर केला पाहिजे, असे मानणारे होते. त्या काळात महिलांना शारीरिकदृष्ट्या नाजूक मानले जात होते. म्हणूनच, सुरुवातीपासूनच पुरुषांना महिलांसाठी दार उघडण्यास, त्यांना पुढे जाऊ देण्यास किंवा त्यांना बसण्यासाठी खुर्ची देण्यास शिकवले जात होते. या परंपरेचा अर्थ महिलांना कमकुवत समजणे नव्हता तर त्यांना आदर आणि प्रेम देणे असा होता.

पुढे १९१२ मध्ये टायटॅनिक जहाज बुडत होते, तेव्हाही 'लेडीज अँड चिल्ड्रन फर्स्ट' म्हणत महिला आणि मुलांना बुडत्या जहाजातून प्रथम बाहेर काढण्याचे निर्देश देण्यात आले होते. ही घटनाही 'लेडीज फर्स्ट'च्या विचारसरणीला बळकटी देणारी ठरली. म्हणूनच टायटॅनिक घटनेनंतर हा शिष्टाचार मोठ्या प्रमाणात स्वीकारला गेला. आजही अनेकजण आवर्जून असे वागतात. तर मग तुम्हीही हा नियम पाळणार ना?

**ठिपके जुळवा**



## असं आहे स्मार्ट दप्तर

**छोटे उस्ताद**




जगभरातल्या शास्त्रज्ञांनी विविध शोध लावले. या शोधांमुळे माणसाचं जीवन सुकर होत आहे. पण शोध लावण्यात लहानगेही मागे नाहीत बरं का! छोट्या आर्यन तंवरने स्मार्ट दप्तराचा शोध लावला आहे. तुम्हा मुलांवर दप्तराचं प्रचंड ओझं असतं. हे ओझं कमी करण्यासाठी काय करता येईल, याचा विचार करता करता त्याने स्मार्ट दप्तरच बनवून टाकलं. शाळेचं वेळापत्रक असतं. दररोजचे तास ठरलेले असतात. त्या त्या विषयाचं पुस्तक आणि वह्या शाळेत न्याव्या लागतात. दप्तर भरताना प्रत्येक वेळी वेळापत्रक बघावं लागतं. पण हे स्मार्ट दप्तर तुमचं वेळापत्रक लक्षात ठेवेल आणि प्रत्येक दिवसाचं वेळापत्रक तुम्हाला सांगेल. प्रत्येक दिवशी कोणती वह्या-पुस्तकं न्यायची, याची माहिती हे दप्तरच तुम्हाला देईल. रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटीफिकेशन टॅगमुळे हे शक्य होतं. हा टॅग पुस्तकांना लावलेला असतो. दप्तरावर एलईडी लाईट बसवलेला असतो. त्यामुळे तुम्ही दुसऱ्याच विषयाचं वही-पुस्तक भरलं तर हे दप्तर तुम्हाला सूचना देतं. या पुढच्या काळात हे दप्तर तुम्हाला हवामानाचीही माहिती देईल. मुलांनी छत्री किंवा रेनकोट न्यायचा का नाही हे सुद्धा दप्तरच सांगेल.

## घडवा चांगले भवितव्य



**कोण होणार?**

आता प्रत्येक क्षेत्रात डेटाचं महत्त्व वाढलं आहे. आपला डेटा जपून ठेवावा लागतो. मात्र प्रत्येक वेळी एवढा डाटा साठवून ठेवणं शक्य होत नाही. यासाठी क्लाउड काँप्युटिंगचा पर्याय योग्य ठरतो. म्हणूनच आज कंपन्यांना क्लाउड कॉम्प्युटिंगमधल्या तज्ज्ञांची गरज आहे. क्लाउड कॉम्प्युटिंगशी संबंधित विविध अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. हे अभ्यासक्रम, प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केले की कारकिर्दीत अनेक संधी उपलब्ध होतात. क्लाउड कॉम्प्युटिंगचे ऑनलाईन कोर्सही आहेत. ते घरबसल्या पूर्ण करता येतात. कॉलेजमध्ये असतानाही तुम्ही हे अभ्यासक्रम पूर्ण करू शकता. क्लाउड कॉम्प्युटिंग सोल्यूशन्स आर्किटेक्ट, क्लाउड मॅनेजमेंट, सेल्स स्पेशलिस्ट, क्लाउड कॉर्पोरेट सेल्स रिप्रेझेंटेटिव्ह, क्लाउड सॉल्यूशन्स एक्झिक्युटिव्हजसारखी पदं तुम्ही भुषवू शकता. त्यामुळे क्लाउड कॉम्प्युटिंगमध्ये उत्तम भवितव्य घडू शकतं हे लक्षात ठेवा.

## कार्टूनच्या करामती



**फन टाईम**

तुम्ही कार्टून बघत असाल. कार्टूनमधली प्रमुख पात्रं तुम्हाला हसवतं. काही तरी संदेश देतं. डोरेमॉन, मिकी माउस, डोनाल्ड डक, शिंचॅन अशी बरीच पात्रं मुलांना आवडतात. मात्र आपल्याला या कार्टून पात्रांविषयी बऱ्याचशा गोष्टी माहीत नसतात. चला तर, मग कार्टून्सची गुपितं जाणून घेऊ.

* 'टॉम अँड जेरी' हे कार्टून तुम्हाला माहीत आहे. टॉम आणि जेरी म्हणजे मांजर आणि उंदिर. ते एकमेकांचे शत्रू. त्यांच्या या भांडणात कधी टॉमची सरशी होते तर कधी जेरी जिंकतो. छोटासा जेरी टॉमला जेरीस आणतो. पण सुरूवातीला ही पात्रं जेस्पर आणि जिंक्स या नावाने ओळखली जायची. त्यानंतर त्यांची नावं बदलण्यात आली.

* मिकी माउस सगळ्यांचा आवडता. हा सुद्धा उंदिरच. हा मिकी माउस मध्यंतरी ८० वर्षांचा झाला. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात गुप्तहेर 'मिकी माउस' या शब्दाचा वापर करत. गुप्त शब्द म्हणून मिकी माउसचा वापर व्हायचा. आता हाच मिकी माउस मुलांचा आवडता बनला आहे.

* 'टिनेज म्युटेड निंजा टर्टल' हे कार्टून तुम्ही बघितलं असेल. यातले टर्टल्स वेगवेगळ्या रंगाचे हेडबँड्स बांधतात. पण सुरवातीला सगळ्यांचे हेडबँड्स लाल रंगाचे होते. प्रत्येकाची वेगळी ओळख पटावी म्हणून निर्मात्यांनी त्यांना वेगवेगळ्या रंगाचे हेडबँड दिले.

## निसर्गाचे रहस्य



**गप्पांगण**

**वीणा देशमुख**

मुलांनो, केळी हे एक सुपरफूड असल्याचे तुम्ही जाणत असाल. त्यामुळे केळी खाल्याने आपल्याला त्वरित ऊर्जा मिळते शिवाय अनेक आजारांपासून शरीराचे संरक्षण करण्यास देखील याची मदत होते. बरेच लोक नाश्त्यापासून संध्याकाळची थोडीशी भूक भागवण्यापर्यंत आहारात केळाचा समावेश करतात. याशिवाय स्नायूंच्या बळकटीप्रमाणेच शरीरात इलेक्ट्रोलाइट्चे संतुलन राखण्यासाठीही केळी वरदान ठरतात. एकंदरीत हे फक्त एक फळ नाही तर गुणधर्मांचा खजिना आहे. पण केळी थोडीशी वाकलेली का असतात, याचा तुम्ही कधी लक्षात घेतले आहे का? मुलांनो, त्यामागे निसर्गाचे एक रहस्य लपलेले आहे. म्हणूनच सरळ-चपटी केळी क्वचितच दिसतात. केळीच्या वाकड्यापणाचे सर्वात मोठे कारण म्हणजे 'फोटोट्रॉपिझम' म्हणजेच वनस्पतींचा सूर्याकडे झुकणे हे आहे. केळीचे झाड फळे देण्यास सुरुवात करते तेव्हा कळ्या खाली वाकलेल्या असतात. म्हणजेच फळाची सुरुवातीची वाढ गुरुत्वाकर्षणाच्या दिशेने होते. फळ वाढू लागताच केळीमधल्या पेशी सूर्यप्रकाशाकडे वाकू लागतात. ही एक नैसर्गिक प्रक्रिया असते ज्यामध्ये फळ हळूहळू वरच्या दिशेने वाढू लागते. अशा परिस्थितीत सूर्याकडे झुकल्यामुळे केळी सरळ होण्याऐवजी वरच्या दिशेने वाकलेली आणि वाकडी दिसतात.

## असं आहे खवय्यांचं शहर



**नॉलेज**

मुलांनो, आपला देश विविधतेने नटला आहे. इथल्या प्रत्येक प्रांताचं एक वेगळेपण आहे. आपल्या देशातलं प्रत्येक शहरही वेगळं आहे. तिथले खाद्यपदार्थ, पर्यटनस्थळं यात विविधता आढळते. चला तर, मग सिटी ऑफ जॉय म्हणजेच कोलकाताची माहिती घेऊ.

* १९११ पर्यंत कलकत्ता म्हणजे आजचं कोलकाता ही भारताची राजधानी होती. व्यापाराच्या दृष्टीने या शहराचं बरंच महत्त्व असल्यामुळे ब्रिटिशांनी कोलकात्याला राजधानीचा दर्जा दिला होता. त्यानंतर दिल्ली भारताची राजधानी बनली.

* कोलकात्यातल्या लोकांना फूटबॉल प्रचंड आवडतं. मात्र क्रिकेटवरही त्यांचं प्रेम आहे. ईडन गार्डन्स हे जगातलं तिसरं सर्वात मोठं क्रिकेट मैदान कोलकात्यात आहे.

* दक्षिणेश्वर काली मंदिर, व्हिक्टोरिया मेमोरियल, मार्बल पॅलेस, फोर्ट विलियम आणि हावडा ब्रिज ही कोलकात्यातली महत्त्वाची पर्यटनस्थळं आहेत.

* कोलकाता हे खवय्यांचं शहर आहे. इथे चविष्ट बंगाली मिठाया मिळतात. तसंच माछेर झोल, मिष्ठी दही, गोलगप्पा इथे आवडीने खाल्ले जातात. त्यामुळे कोलकात्याला गेल्यावर हे पदार्थ चाखायलाच हवेत.

* कोलकात्यात पुस्तक महोत्सवाचं आयोजन केलं जातं. या महोत्सवाला लोक मोठ्या संख्येने येतात. असं हे कोलकाता पश्चिम बंगालची राजधानी आहे. देशातल्या चार महानगरांमध्ये कोलकाताची गणना होते.




**दोस्त हे मस्त**

### अँजल शार्क



अँजल शार्क नावाचा एक प्राणी आहे. काळा समुद्र, भूमध्य समुद्र आणि नॉर्दन अटलांटिक समुद्र या भागात हा शार्क आढळतो. अँजल शार्कची मोठ्या प्रमाणावर शिकार होत आहे. त्यामुळे त्यांची संख्या कमी होत चालली आहे. भूमध्य समुद्र तसंच इतर भागात खूप कमी शार्क दिसतात. सध्या शार्कची ही प्रजाती वाचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

**खादाडी**

### चविष्ट बिस्किट केक



दोस्तांनो, तुम्ही बिस्किटांचा केक बनवू शकता. यासाठी हाईड अँड सिक बिस्किटांचा एक पुडा घ्या. पारले जीचाही पुडा घ्या. दोन चमचे साखर, अर्धा चमचा बेकिंग पावडर, एक कप दूध, व्हॅनिला इसेन्स आणि चमचाभर बटर हे साहित्य घ्या. आता दोन्ही बिस्किटं मिक्सरमध्ये वाटून घ्या. बारीक पूड करा. ही पूड एका बाऊलमध्ये काढून घ्या. त्यात दूध आणि साखर घालून नीट मिक्स करा. यात बेकिंग पावडर आणि व्हॅनिला इसेन्स घाला. आता केकचा ट्रे घ्या. त्यावर बटर लावा. त्यावर हे मिश्रण ओता. आता हा ट्रे मायक्रोवेव्हमध्ये ठेवा. पाच मिनिटांनी काढा. तुमचा बिस्किट केक तयार आहे.

**स्टडी टिप्स**

### लागा अभ्यासाला



छोट्यांनो, हळूहळू परीक्षेचे वेध लागतील. आता तुमचा अभ्यास वाढू लागला असेल. त्यामुळे अभ्यासाचा जोर लावायला हवा. आता अभ्यासाचं नियोजन करून कामाला लागा. सकाळी लवकर उठून अभ्यास करा. यासाठी मोबाईलवर अलार्म लावा. अलार्म वाजल्यावर उठा. जवळ कॅलेंडर ठेवा. महत्त्वाच्या दिवसांची नोंद करून ठेवा. कोणत्या विषयाचा अभ्यास किती वेळात होईल हे बघा. त्यानुसार नियोजन करा.

**योगा टाईम**

### एकाग्रता वाढवणारं बालासन



मुलांनो, आपली एकाग्रता वाढवायला हवी. योगासनांमुळे तुम्ही लक्ष केंद्रित करू शकता. बालासन हा प्रकार खूपच उपयुक्त आहे. बालासन म्हणजे लहान मुलांप्रमाणे डोकं जमिनीवर टेकवणं. या आसनामुळे एकाग्रता वाढते. भरपूर अभ्यास करण्यासाठी तुमची बुद्धी तल्लख व्हायला हवी. बालासनामुळे हे शक्य होतं.

# टूथपेस्ट, बाम, केसांच्या तेलामुळे मायग्रेन, अपस्मार विकार?

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :



दैनंदिन जिवनात नागरिकांकडून टूथपेस्ट, बाम, केसांच्या तेलाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. परंतु या पदार्थांमध्ये मेंदूला उत्तेजित करणारे काही घटक असतात. त्यामुळे मेंदूला संभावित धोक्याबाबत मेंदूरोग तज्ज्ञांकडून गंभीर इशारा दिला आहे.

अनेक कंपन्यांच्या टूथपेट, केसांचे तेल आणि बाम यासारख्या उपादनांमध्ये मेंदूला उत्तेजित करणारे घटक असतात. हे अपायकारक घटक तोंडाच्या संवेतनशिल त्वचेद्वारे शोषले जाऊ शकतात. त्यामुळे ते रक्त- मेंदूत अडथळ्याचा धोका असतो.

या रासायनिक प्रक्रियेद्वारे मेंदूतील न्यूरॉन्स वारंवार एखाद्या उत्तेजनाच्या संपर्कात येतात. विशेषतः २४ ते ४८ तासांच्या अंतराने. ज्यामुळे मेंदूच्या विविध क्षेत्रांमध्ये अतिउत्साह न्यूरॉन्स, सर्किट आणि नेटवर्क तयार होतात. त्यामुळे मायग्रेन, अपस्मार यांसारख्या विकारांचा विकास होऊ शकतो, असे वर्ल्ड फेडरेशन ऑफ न्यूरोलॉजीचे विश्वस्थ व पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांनी सांगितले.

प्राथमिक अभ्यासात काही घटकांच्या संपकार्मुळे मायग्रेन, क्लस्टर डोकेदुखी, ट्रायजेमिनल न्यूराल्जिया, चक्कर किंवा व्हर्टिगो, शरीराच्या एका बाजूला वेदना, अपस्मार, चिंता, पॅनिक अटॅक, सायकोसिस आणि नैराश्य यासारख्या आजारांशी संबंध असल्याचे दिसून आले असल्याचेही डॉ. मेश्राम यांनी प्रसिद्धीपत्रकातून सांगितले.

रुग्णांवर उपचारादरम्यान डॉक्टरांना टूथपेस्टचा वापर थांबवून अथवा टूथपेस्टची कंपनी बदलून रुग्णांना लक्षणांपासून आराम होत असल्याचेही मेंदूरोग तज्ज्ञांकडून निरीक्षण नोंदवले जाते.

२०२१ मध्ये आंतराष्ट्रीय शोध प्रबंधानुसार एका प्रकरणात टूथपेस्टच्या वापराशी संबंधित क्लस्टर डोकेदुखीचा अहवाल दिला गेला. त्यात टूथपेस्टचा वापर थांबवल्यावर २ आठवड्याच्याआत रुग्ण पूर्णपणे बरा झाला. मायग्रेनच्या रुग्णांनी टूथपेस्ट आणि ओव्हर दे काउंटर बामचा वापर बंद केल्याने डोकेदुखीच्या लक्षणात खुप कमी आल्याचेही निरीक्षण नोंदवले.

**मेंदूत प्लास्टिक**

प्रौढ झेब्राफिश मॉडेल्स वापरून केलेल्या अन्वेषणात्मक अभ्यासात टूथपेस्टच्या संपर्कात रुग्णामध्ये अतिक्रियाशीलता, आक्रमकता आणि चिंता वाढल्याचे आढळले आहे. तर बऱ्याच टूथपेस्टमध्ये नॅनो आणि मायक्रोप्लास्टिक्स आढळले असून ते मेंदूत जमा झाल्यामुळेही त्रास होऊ शकतो, असेही डॉ. मेश्राम म्हणाले.

टूथपेस्टला पाणी किंवा मिठाचे पाणी सारख्या निष्क्रिय पर्यायांनी बदलल्यास मायग्रेन, क्लस्टर डोकेदुखी, चिंता यासारख्या न्यूरोसायकियाट्रिक स्थितींचा भार लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतो, असेही डॉ. मेश्राम म्हणाले.

# मुसळधार पावसाचा तडाखा

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. २५ :



दोन दिवसापासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील नदी नाले दुथडी भरून वाहत असून अनेक भागात पूरस्थिती निर्माण झाली आहे.

भामरागड तालुक्याला जोडणाऱ्या पर्लकोटा नदीच्या पुलावरुन पाणी वाहू लागल्याने सकाळपासून भामरागड तालुक्यातील शंभरहून अधिक गावांचा जिल्हा मुख्यालयाशी संपर्क तुटला आहे. पुरामुळे आलापल्ली-भामरागड मार्ग बंद असून, जिल्ह्यातील चार मार्गावरील वाहतूक ठप्प झाली आहे. प्रशासनाने अतिवृष्टीचा रेड अलर्ट जारी केल्याने दक्षिणेकडील शाळा, महाविद्यालयांना आज सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

मागील चोवीस तासांत भामरागड तालुक्यात सर्वाधिक ९९.२ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. त्या खालोखाल एटापल्ली तालुक्यात ६८.४ मिलिमीटर पाऊस पडला. जिल्ह्यातील नऊ विभागांमध्ये अतिवृष्टी झाली असून, ताडगाव परिसरात १२० मिलिमीटर पाऊस पडला आहे.

पर्लकोटा नदीच्या पुलावरुन पाणी वाहू लागल्याने आलापल्ली-भामरागड मार्ग बंद आहेत. यामुळे ५० हून अधिक गावांचा संपर्क तुटला आहे. शिवाय सिरोंचा असरअली, ताडगाव-दामरंचा व अहेरी-वट्रा हे मार्गही बंद आहेत.

भंडारा जिल्ह्यातील गोसेखुर्द धरणाचे ३३ पैकी २७ दरवाजे अर्धा मीटरने उघडण्यात आले आहेत. त्यातून ३०२४ क्युसेक पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. दरम्यान, प्रशासनाने रेड अलर्ट जारी केल्याने प्रशासनाने चामोर्शी, अहेरी, भामरागड, मुलचेरा, सिरोंचा इत्यादी तालुक्यांतील शाळा, महाविद्यालयांना सुटी जाहीर केली आहे.

**६४ नागरिक सुरक्षितस्थळी**

जिल्ह्याच्या दक्षिण भागाला पावसाचा सर्वाधिक फटका बसलेला आहे. अजूनही मुसळधार पाऊस सुरू असल्याने आलापल्ली येथील बीएसएनएल टॉवर परिसरातील घरात पाणी शिरल्याने ६४ नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. प्रशासनाने नदीकाठावरील गावांना सतर्कतेचा इशारा दिला असून पुलावरून पाणी वाहत असल्यास ओलांडण्याच्या प्रयत्न करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. आपत्ती व्यवस्थापनाच्या चमूला सतर्क करण्यात आले आहे.

## मुंबईत १२ व्या मजल्यावरून पडून ४ वर्षीय चिमुरडीचा दुर्दैवी मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २५ :

वसई पूर्वेकडील नायगाव परिसरातील इमारतीच्या १२ व्या मजल्यावरून खाली पडून एका ४ वर्षीय चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाला. अन्विका प्रजापती ही आईसोबत घराबाहेर जाण्याच्या तयारीत असताना तोल जाऊन ती खाली पडली व जागीच मृत्यू झाला.

आईने चप्पल घालण्यासाठी मुलीला खिडकीजवळ असलेल्या लाकडी स्टँडवर बसवले होते. पण काही सेकंदातच अन्विका खिडकीवरील कठड्यावर बसण्याचा प्रयत्न करत असताना तिचा तोल गेला. खिडकीला सुरक्षा जाळी नसल्याने ती थेट खाली कोसळली. हा संपूर्ण प्रकार सीसीटीव्हीमध्ये कैद झाला. इमारतीत राहणाऱ्या नागरिकांनी अन्विकाला उपचारासाठी वसईतील महापालिकेच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी मृत घोषित केले.

## महायुतीमुळे सरकार कंगाल अन् भिकारी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २५ :



माणिकराव कोकाटे जे बोलले ते खरं आहे सरकार भिकारी झाले आहे. गेल्या ३-४ वर्षांमध्ये भिकारी आणि कंगाल करण्याचे पाप महायुती सरकारचे आहे. पैशाची उधळपट्टी, तिजोरीची लुट आणि वाढवलेली टक्केवारी यामुळे राज्य सरकार भिकारी आणि कंगाल झाले आहे, असा घणाघात कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

वडेट्टीवार म्हणाले की, कोणतेही काम करायचे असेल तर किमान २० टक्के द्यावे लागतात , त्याशिवाय काम होतच नाही, असा आरोपही त्यांनी यावेळी केला आहे. जुलै महिना संपत आला असून डीपीडीसीचे पैसे मिळालेले नाही. ५ महिन्यांपासून निराधार लोकांना पैसे दिले गेले नाही. राज्यात रोज ७ शेतकरी विविध कारणाने आत्महत्या करतात. आता ही परिस्थिती कंत्राटदारांच्या आत्महत्येपर्यंत आली आहे.

वडेट्टीवार म्हणाले की, आता जर कंत्राटदारांचे आत्महत्या सुरू झाल्या तर राज्यात नावालाही कंत्राटदार शिल्लक राहणार नाही. ८८ हजार कोटीचे साबांविचे देणे बाकी आहे. हरघर नल देणार म्हणणाऱ्यांकडे पाणी देण्यासाठी पैसे नाही.

लाज विकून खाल्लेले सरकार महाराष्ट्रात आले आहे. एकीकडे कंत्राटदार आत्महत्या करत आहे आणि दुसरीकडे पैशाचा बँगा भरलेल्या आहेत, चड्डी बनियन गँग, टावेल बनियन गँग महाराष्ट्रात तयार झाल्या आहेत. ह्या महाराष्ट्राला लुटण्यासाठी तयार झाल्या आहेत. हे डाकू, दरोडेखोर यांना लाजवतील.

वडेट्टीवार म्हणाले की, सरकार जर ४ मंत्र्यांवर कारवाई करायला गेले तर उद्या १४ चे फोटो समोर येतील. त्यामुळे मुख्यमंत्री जपून कारवाई करत आहे. आमच्याकडे काही फोटो, सीडी आहे. गृह राज्यमंत्र्यांच्या आईच्या नावाने असणाऱ्या बारमध्य बारबाला नाचवल्या जात आहे, किमान मंत्री असेपर्यंत तरी बार बंद करायचा ना? त्यांच्या बार वर जर धाड पडत असेल तर हे तलवारी हातात न घेता सुरू असलेले युद्ध असल्याचेही ते म्हणाले.

# नागपूर जिल्हा परिषदेतील कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांची पदे गहाळ

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. २५ :

नागपूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी (वर्ग ३, श्रेणी ३) संवर्गातील पदे गेल्या १० ते १२ वर्षांपासून गहाळ आहेत. या मुद्यावर नागपूर जिल्हा परिषद केंद्रप्रमुख समन्वय समितीचे जिल्हा समन्वयक तसेच मनसे शिक्षक-शिक्षकेतर सेनेचे राज्य सरचिटणीस शरद भांडारकर यांनी सखोल चौकशीची मागणी केली आहे.

या प्रशासनिक हलगर्जीमुळे शेकडो प्राथमिक शिक्षकांना पदोन्नतीपासून वंचित रहावे लागले असून शासनाच्या तिजोरीवर लाखो रुपयांचा फटका बसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**शासनाच्या मंजुरीविना पदवर्ग बदल**

माहितीनुसार, श्रेणी ३ ची पदे नियमबाह्य पद्धतीने श्रेणी २ मध्ये परवर्तीत करण्यात आली. विशेष म्हणजे, यासाठी शासनाची कोणतीही स्पष्ट मंजूरी नसताना, तत्कालीन अधिकाऱ्यांनी हा प्रकार केल्याचे पुढे आले आहे. परिणामी, कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना थेट ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे वेतन देण्यात आले आणि शासनाचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले.

हा गंभीर गैरप्रकार असतानाही लेखा व वित्त विभाग, तसेच सामान्य प्रशासन विभागाने या प्रकरणाकडे दुर्लक्ष केले.

नागपूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागात शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांची एकूण ५४ पदे मंजूर आहेत. यापैकी काही पदे पंचायत समिती स्तरावर तर उर्वरित जिल्हा परिषद मुख्यालयावर कार्यरत असावीत, अशी माहिती आहे. मात्र, या ५४ पैकी किती पदे श्रेणी ३ आणि श्रेणी २ मधील आहेत, याबाबतची माहिती शिक्षण विभागाकडून लपवून ठेवण्यात आली आहे. त्यामुळे प्रकरण अधिक संशयास्पद ठरत आहे.

या पार्श्वभूमीवर, मनसे शिक्षक-शिक्षकेतर सेनेचे राज्य सरचिटणीस शरद भांडारकर यांनी प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, गहाळ पदे तात्काळ भरावीत, अशी मागणी शासनाकडे केली आहे.

**शिक्षकांच्या न्यायहक्काला धोका**

या प्रकरणामुळे आजवर शेकडो प्राथमिक शिक्षकांना पदोन्नतीपासून वंचित राहावे लागले आहे. फक्त वरिष्ठांच्या गलथान कारभारामुळे त्यांना आर्थिक फटका बसला आहे. त्यांच्या वेतनवाढीवर, सेवाजिवनावर व भविष्यनिर्भरतेवर परिणाम झाला असून, या शिक्षकांचा नैसर्गिक न्यायही हिरावला गेला आहे.

: साप्ताहिक संवाद :

## प्रायोगिक नाट्यकर्मींसाठी खुला मंच नाट्य शुक्रवार



लोकरंग

महाराष्ट्रातील अगदी खेड्यापाड्यात अनेक हौशी नाट्यकर्मींच्या प्रायोगिक नाट्यसंस्था आहेत .अनेक नाट्यसंस्था या दर्जेदार आणि कल्पक अशी प्रायोगिक नाटक सादर करत असतात. परंतु या कलाकारांना योग्य तो मंच उपलब्ध होत नाही. त्यामुळे अशी दर्जेदार नाटकं दुर्लक्षित राहतात. म्हणूनच अशा नाट्यकर्मींना मुक्त मंच उपलब्ध करून द्यावा आणि त्याच अनुषंगाने महाराष्ट्रातील आपली पुरातन पारंपरिक नाट्य कला पुनरुज्जीवित करून या नाट्य परंपरेला बळ मिळावं, उर्जितावस्था मिळावी याकरता मुंबई मराठी पत्रकार संघाच्या वतीने नाट्य शुक्रवार हा अभिनव उपक्रम अलीकडेच सुरु करण्यात आलेला आहे. याच अभिनव उपक्रमासंदर्भात पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**मुंबई मराठी पत्रकार संघाचा नाट्य शुक्रवार हा उपक्रम नेमका काय आहे?**

■ आपल्या महाराष्ट्राला मराठी नाटकांची फार मोठी परंपरा लाभलेली आहे. प्रायोगिक नाटकांची देखील आपली परंपरा आहे. अशाच महाराष्ट्रातील अगदी खेड्यापाड्यातील प्रायोगिक नाट्यकमीर्ना खुला मंच उपलब्ध करून देण्यासाठीच मुंबई मराठी पत्रकार संघाच्या वतीने नाट्य शुक्रवार हा अभिनव उपक्रम सुरु केला गेला आहे.

या उपक्रमांतर्गत प्रत्येक महिनाय्च्या शेवटच्या शुक्रवारी संघाच्या लोकमान्य सभागृहात अशा नाट्यकमीर्ना आपली प्रायोगिक नाटक सादर करता येतील. या साठी कोणतेही प्रवेश शुल्क आकारण्यात येणार नसून नाट्यप्रेमी प्रेक्षकांना देखील हि नाटकं अगदी मोफत पाहायला मिळणार आहेत. मात्र यासाठी प्रायोगिक नाट्यकर्मींना संघाकडे आपल्या नाटकाची प्रवेशिका पाठवावी लागणार आहे.

**या उपक्रमात सहभागी नाटकांसाठी पात्रतेतेचे निकष काय असणार आहेत?**

■ सर्वात महत्वाचं म्हणजे महाराष्ट्रातील कोणत्याही जिल्हयातील अगदी गावातील नाट्यकर्मी आपली प्रायोगिक नाटक अगदी एकपात्री नाटक देखील या मंचावर सादर करू शकतील.

आमच्याकडे आलेल्या प्रवेशिका तपासण्यासाठी संघाचे विश्वस्त देवेंद्र मटाले, नाट्यकर्मी नयना रहाळकर आणि अजित देवधर या तिघांची समिती या नाटकाची संहिता,कालावधी, दिगदर्शन आणि हा प्रयोग केवळ दीर्घांक आहे का? अशा बाबी तपासून मगच अशा नाट्यकर्मींना जे निकषात पात्र असतील अशाना संधी दिली जाणार आहे. महाविद्यालयीन विद्यार्थी जे एकांकिका सादर करतात ते देखील यासाठी प्रवेशिका सादर करू शकतात.

**पत्रकार संघाच्या वतीने सहभागी नाट्यकर्मींना अनुदान देखील दिले जाणार आहे त्याबद्दल?**

■ हो . आमच्या या उपक्रमात जी प्रायोगिक नाटक सहभागी करून घेतली जातील अशा नाट्यकर्मींना प्रोत्साहनपर १० हजार रुपयांचे अनुदान संघाच्या वतीने दिले जाणार आहे. नाट्य शुक्रवार या उपक्रमाला इंडियन ऑइल कंपनीने प्रायोजकत्व दिले असून मराठी प्रायोगिक नाट्यकमीर्ना बळ मिळावं हाच यामागचा उद्देश आहे. या उपक्रमाला नाट्यकर्मी आणि प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद जर लाभला तर भविष्यात हा उपक्रम प्रत्येक शुक्रवारी देखील होऊ शकेल. ■ ■ ■

## भारताच्या शाश्वत औद्योगिक विकासाला चालना देणारे AVEVA डे इंडिया प्रदर्शन



औद्योगिक सॉफ्टवेअर मधील जागतिक आघाडीवर आणि श्नायडर इलेक्ट्रिक ग्रुपचा भाग असलेल्या AVEVA ने मुंबईत AVEVA डे इंडिया 2025 चे यशस्वीरित्या आयोजन केले, ज्यामध्ये औद्योगिक अक आणि मूलगामी सहकार्य भारताच्या शाश्वत विकासाच्या कथेला कसे चालना देत आहेत यावर चर्चा करण्यासाठी ऊर्जा, पायाभूत सुविधा, उत्पादन आणि उपयुक्तता क्षेत्रातील भागधारकांना एकत्र आणले.

वरिष्ठ उद्योग व्यावसायिकांच्या उपस्थितीत, AVEVA डे इंडिया 2025 तंत्रज्ञान प्रदर्शन, विचार नेतृत्व सत्रे आणि क्रॉस-इंडस्ट्री सहकार्यासाठी एक गतिमान व्यासपीठ म्हणून काम केले. औद्योगिक कामकाजाचे भविष्य आणि जबाबदार नवोपक्रम या विषयावर आधारित या कार्यक्रमात १ ट्रिलियन डॉलर्सची निर्यात अर्थव्यवस्था निर्माण करण्याच्या भारताच्या महत्त्वाकांक्षेला पुढे नेण्यासाठी डिजिटलायझेशनच्या धोरणात्मक भूमिकेवर प्रकाश टाकण्यात आला, तसेच हवामान आणि कार्यबल विकास उद्दिष्टे देखील पूर्ण करण्यात आली.

भारतीय उद्योग चौथ्या औद्योगिक क्रांतीला (उद्योग ४.०) स्वीकारत असताना, औद्योगिक बुद्धिमत्ता एआय, आयओटी, रोबोटिक्स आणि मोठ्या डेटा विश्लेषणाचे एकत्रीकरण स्मार्ट कारखाने, ऑप्टिमाइज्ड ऑपरेशन्स आणि लवचिक पुरवठा साखळ्यांकडे एक खोलवर वळण घेत आहे. AVEVA या प्रवासात संस्थांना डेटाचे रूपांतर ऊर्जा कार्यक्षमता, चपळता आणि नवोपक्रमाच्या अंतर्दृष्टीमध्ये करण्यास मदत करून महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

AVEVA चे इंडिया मार्केट लीडर, उपाध्यक्ष अजित कुलकर्णी म्हणाले, आर्थिक वाढ आणि शाश्वतता या दुहेरी आवश्यकतांमुळे चालणाऱ्या एका गहन औद्योगिक परिवर्तनाच्या आघाडीवर भारत उभा आहे. आव्हान केवळ नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे नाही तर अखंड सहकार्याला चालना देणे आणि त्याचा प्रभावीपणे वापर करण्यासाठी कुशल कार्यबल तयार करणे हे आहे. भारताची राष्ट्रीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी डेटाचे खरे मूल्य उलगडण्यासाठी औद्योगिक बुद्धिमत्ता ही गुरुकिल्ली आहे. AVEVA च्या उपायांद्वारे, आम्ही भारतीय उद्योगांना सिल केलेली माहिती कृतीयोग्य अंतर्दृष्टीमध्ये रूपांतरित करण्यास सक्षम करत आहोत. हेच त्यांना नावीन्यपूर्णतेचे प्रमाण वाढविण्यास, जागतिक स्तरावर नेतृत्व करण्यास आणि संसाधन-जागरूक जगात शाश्वतपणे कार्य करण्यास सक्षम करेल.

या कार्यक्रमातील प्रमुख आकर्षणांपैकी एक म्हणजे औद्योगिक एआय बदल कसा चालवू शकतो आणि वाढीचे नवीन मार्ग कसे अनलॉक करू शकतो या शीर्षकाची पॅनेल चर्चा.

सत्रात एआय भारताच्या औद्योगिक परिदृश्यात पद्धतशीर बदल कसा सक्षम करत आहे याचा शोध घेण्यात आला. स्मार्ट ऊर्जा वापर आणि उत्सर्जन कमी करण्यापासून ते पुरवठा साखळी पारदर्शकता आणि कार्यबल नवोपक्रमापर्यंत चर्चा केली गेली. AVEVA मधील पॅनेललिस्ट आणि त्यांचे ग्राहक ज्यात राकेश पांडे ग्लोबल हेड-पीएलएम प्रॅक्टिस, एल अँड टी टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस, अरविंद काकरू -व्हीपी इंडस्ट्रियल ऑटोमेशन, श्निएडर इलेक्ट्रिक, अरुण भारद्वाज - व्हीपी ऑपरेशन्स एक्सलन्स, मित्तल एनर्जी लिमिटेडआणि राहुल जाधव सल्लागार भागीदार लाईफसायन्सेस आणि अर्न्स्ट अँड यंग यांचा समावेश होता. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## धनंजय मुंडे सर्वांगाने अस्वच्छ...

पुन्हा मंत्रिमंडळात घेऊ नका, दमानिया यांचा सरकारला इशारा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २५ :



माजी मंत्री धनंजय मुंडे यांना कृषि खात्यातील भ्रष्टाचारा प्रकरणी मिळालेल्या कथित क्लीनचिटवर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

धनंजय मुंडे हे कोणत्याही अंगाने स्वच्छ नाहीत. त्यामुळे त्यांना पुन्हा मंत्रिमंडळात घेऊ नका, असे त्यांनी महायुती सरकारला बजावले आहे. त्यांनी हायकोर्टाच्या निर्णयाला वरच्या कोर्टात आव्हान देण्याचेही संकेत दिलेत.

अंजली दमानिया यांनी माजी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर तब्बल २४५ कोटींच्या घोटाळ्याचा आरोप केला होता. या प्रकरणी त्यांनी त्यांच्या काळात झालेल्या कृषि साहित्याच्या अधिक दराने केलेल्या खरेदीवर बोट ठेवले होते. पण मुंबई उच्च न्यायालयाने ही खरेदी प्रक्रिया राज्य मंत्रिमंडळाची मान्यता घेऊनच राबवण्यात आल्याचे नमूद करत एकप्रकारे त्यांना क्लीनचिट दिली आहे. या पार्श्वभूमीवर अंजली दमानिया यांनी शुक्रवारी एका पत्रकार परिषदेद्वारे आपण आपल्या आरोपांवर ठाम असल्याचे स्पष्ट केले आहे.

धनंजय मुंडे यांना सत्यमेव जयते असे म्हणणे शोभत नाही. ते कोणत्याही अंगाने क्लिन अर्थात स्वच्छ नाहीत. त्यामुळे फडणवीस यांनी त्यांना पुन्हा मंत्रिमंडळात संधी देऊ नये. धनंजय मुंडे यांच्यानंतर माणिकराव कोकाटे कृषीमंत्री झाले हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. याचिकाकर्त्यांची चुकीची मांडणी, सरकारी वकिलांचा घोळ हे सर्व त्यांच्या पथ्यावर पडले, असेही अंजली दमानिया यांनी आपला संताप व्यक्त करताना म्हटले आहे.

## मंत्रिमंडळात छोटेखानी फेरबदल

■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि. २५ :



राज्य मंत्रीमंडळात छोटा फेरबदल होऊ शकतो. मोठ्या बदलाचे कुठलेही संकेत नाही. चंद्रपूर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींचा मंत्रीमंडळात समावेश असावा, ही आमची आग्रही मागणी आहे असे मत भाजप आमदार किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केले.

आमदार जोरगेवार यांच्यासोबत ओबीसी नेते डॉ.अशोक जीवतोडे, भाजप महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, प्रकाश देवतळे, अजय जयस्वाल, तुषार सोम, छबु वैरागडे यांच्यासह भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी जोरगेवार यांनी मंत्रिमंडळात फार मोठे बदल होण्याची शक्यता फेटाळून लावली.

मुख्यमंत्री, राज्यातील पक्ष नेतृत्व तसेच जी काही राजकीय माहिती आहे, त्या आधारावर सध्या तरी मंत्रीमंडळात मोठा बदल नाही, एक दोन वादग्रस्त मंत्र्यांबाबत वाद आहे. त्यामुळे फेरबदल झाला तरी छोटेखानी बदल होईल, असे जोरगेवार म्हणाले. आज घडीला भाजपात येण्यास अनेक जण इच्छुक आहेत. यामध्ये शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस व उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या आमदारांचा समावेश आहे. त्यामुळे त्यांच्यासाठी बदल होवू शकतो, असेही ते म्हणाले.

# मुंबईसह बहुतांश जिल्ह्यांत पावसाचा जोर

● लोकल सेवा विस्कळीत : चाकरमान्यांची दैना : भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोलीला रेड अलर्ट ●

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई / नागपूर, दि. २५ :



**समुद्राला तुफान भरती**

हवामान खात्याच्या माहितीनुसार, सलग दोन दिवस समुद्राला उधाण येणार आहे. यावेळी समुद्रात साडेचार मीटरपेक्षा जास्त उंचीच्या लाटा उसळण्याची शक्यता आहे. भरतीच्या वेळी समुद्रकिनारी जाणे टाळावे व प्रशासनाने जारी केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन मुंबई महापालिकेतर्फे करण्यात आले आहे. समुद्राला शनिवारी सर्वात मोठी भरती येणार आहे. यावेळी ४.६७ मीटर एवढ्या उंच लाटा उसळण्याची शक्यता आहे.

गत काही दिवसांपासून गायब झालेला पाऊस शुक्रवारी पुन्हा एकदा परतला आहे. मुंबई व उपनगरांसह राज्यातील बहुतांश जिल्ह्यांत आज पहाटेपासून पावसाची रिपरिप सुरू झाली आहे. मुंबईत शुक्रवारी हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस झाला असून, विदभार्तील भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्ह्यांना अतिवृष्टीचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

मुंबईत शहर व उपनगरांत शुक्रवारी पहाटेपासून पावसाची संततधार सुरू आहे. परळ, कुलाबा, वरळी, अंधेरी, मालाड, वांद्रे आदी भागांत पावसाचा जोर वाढला आहे. चालू महिन्याच्या सुरूवातीपासून पावसाने ओढ दिली होती. पण आता गत २ दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे सरासरी गाठेल अशी चिन्हे आहेत.

दुसरीकडे, हवामान खात्याने कोकणातील रायगड, रत्नागिरी, पुणे घाट परिसर, सातारा घाट परिसर, विदर्भातील भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांत आज अतिवृष्टीचा रेड अलर्ट जारी केला आहे. याशिवाय ठाणे, सिंधुदुर्ग, नागपूर या भागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.

तसेच पालघर, नाशिक घाट परिसर, सातारा, कोल्हापूर, अमरावती, हिंगोली, नांदेड या जिल्ह्यांत मुसळधार, तर वाशिम, अकोला, यवतमाळ, परभणी व बुलढाणा या जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यात हवामान खात्याने रेड अलर्ट जारी केला आहे. जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे नद्या दुथडी भरून वाहत आहेत. यामुळे पूरस्थिती उद्भवण्याची शक्यता आहे. माळशेज घाटात पाऊस व धुक्यामुळे परिस्थिती गंभीर झाली आहे.

दरीच्या बाजूला असलेली संरक्षण भिंत आणि समोरुन येणारी वाहने स्पष्ट दिसत नसल्याने प्रवास जीवघेणा ठरत आहे. प्रवाशांकडून घाटातील दरीच्या बाजूला असलेल्या संरक्षक भिंती व कठड्यांवर तसेच रस्त्याच्या मधोमध रिफ्लेक्टर लावण्याची मागणी होत आहे. यामुळे समोरच्या वाहनाचा अंदाज येऊन अपघाताचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

उत्तर बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. हे हवामान प्रणाली ठळक होण्याची शक्यता असून, पश्चिम बंगाल व उत्तर ओडिशाच्या किनाऱ्याकडे येण्याची शक्यता आहे. विदभार्पासून कमी दाबाच्या केंद्रापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा सक्रिय आहे. मध्य महाराष्ट्रापासून केरळपर्यंत किनारपट्टीला समांतर कमी दाबाचा पट्टा तयार झाल्याने पावसाची शक्यता वाढली आहे.